AH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

International Multilingual Research Journal

# VIDYAWARTA®

Issue-22, Vol-12 April to June 2018



Principal
Late.Sow.Shoshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Editor
Dr.Bapu G.Gholap

25) जागतिकीकरणाचा महानगरीय साहित्यावरील प्रभाव....
प्रा. सौरभ पाटणकर, इचलकरंजी || 117

26) महाराष्ट्रातील लोकगीतांची परंपरा आणि लोकगीत प्रकार
प्रा.डॉ.स्नेहाशीष दास.–आशिष विजय रानडे || 121

27) दारिद्र्य संकल्पनेचे बदलते स्वरूप
प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे, वाशिम || 127

28) प्रणाली विश्लेषण आणि सरंचनामध्ये ग्रंथपालाची भुमिका
प्रा. डॉ. राठोड के. आर–प्रा. डॉ. पवार जी. आर. || 130

29) भ्रष्टाचार : एक समस्या
डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव, गंगाखेड, जि.परभणी. || 133

30) स्थानिक शासनाच्या शैक्षणिक प्रशासनाची उत्क्रांती:विशेष संदर्भ ब्रिटीश काळ
प्रा. डॉ. प्रविण पांडुरंगराव लोणारकर, परभणी, महाराष्ट्र || 136

31) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) "चिरायु" एक अध्ययन:....
श्रीमती भूमिका शर्मा, बागबाहरा || 141

32) डॉ. अभिराजराजेन्द्र मिश्र के कथा–साहित्य में विवेचित जीवन–मूल्य
गीनू देवी, जोधपूर || 146

33) समाजवादी विचारधारा का उदय व विकास
Sushil Kumar Agraharai, Karwi, Dist. Chitrakoot, U.P. || 150

34) लघु उद्योगों में कार्यरत् श्रमिकों का विभिन्न आर्थिक आयामों के सन्दर्भ में अध्ययन
स्नेहलता शिवहरे–डॉ॰सविता सक्सेना, कानपुर (यू॰पी॰) || 154

35) शिक्षक शिक्षा की प्रभावकारिता: एक अध्ययन
Dr. Shishir Kumar Yadaw, Hazaribag || 161

36) विधवा जीवन का प्रश्न और वाटर फिल्म
वंदना यादव || 164



Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

29

# भ्रष्टाचार : एक समस्या

डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव
कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड, जि.परभणी.

**********

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताला विविध संकटांना तोंड द्यावे लागले. नैसर्गिक आपत्ती व परकीय आक्रमणे अशा संकटाशी आपण निर्भयपणे मुकाबला केला आहे.परंतु भ्रष्टाचारामुळे सारे भारतीय समाज जीवनच पोखरले गेले आहे. भारतीय समाजाला भ्रष्टाचाराची किड लागलेली आहे. भ्रष्टाचार हे संकट भारतीय लोकशाहीला व ग्रामीण प्रशासनाला भयावह व घातक करू पाहत आहे.

भारतीय समाज जीवनाला भ्रष्टाचारी अजगराने विळखा घातलेला आहे की नाही हे काही ठळक उदाहरणावरून समजून येते. दिल्ली येथे झालेले नगरवाला प्रकरण, बोफोर्स तोफा खरेदी प्रकरण, जर्मन पाणबुड्या खरेदी प्रकरण, रोखे गैर व्यवहारातील हर्षद-मेहता प्रकरण, साखर घोटाळा प्रकरण, मुंबई-पुणे येथील शासकीय व नगरपालिकांच्या भुखंडासंबंधी प्रकरण करचुकवेगिरीची अनेक प्रकरणे, जेन बंधुचे हवाला प्रकरण, झारखंड मुक्ती मोर्चा प्रकरण, मुद्रांक घोटाळा-तेलगी प्रकरण अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे आठवली म्हणजे भ्रष्टाचाराचा राक्षस भारतीय लोकशाहीला कसा गिळंकृत करीत आहे याचे चित्र डोळयासमोर उभे राहते. भारतीय लोकशाहीला वाचविण्यासाठी भारतीय समाजाला शुद्ध-सात्विक, चारित्र्यसंपन्न बनविण्यासाठी भ्रष्टाचाराचे निर्मुलन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**भ्रष्टाचाराचा अर्थ व व्याख्या :-**

भ्रष्टाचाराची निश्चित अशी व्याख्या करता येत नसली तरी भ्रष्टाचाराचा अर्थ समजावून घेणे महत्वाचे आहे. भ्रष्टाचार ही एक विकृती आहे ती नैसर्गिक प्रवृत्ती नाही. कारण मानव प्राणी हा मुलतः वाईट नसतो, तर तो वास्तव परिस्थितीने विकृत बनतो. त्याच्यात अपप्रवृत्ती निर्माण होते. प्रशासकीय भ्रष्टाचाराबाबत असे म्हणता येईल की, "जेव्हा सनदी सेवक प्रशासकीय नियमांना बाजूला सारून व्यक्तिगत फायदयासाठी नियमबाह्य वर्तनाद्वारे विशिष्ट लोकांचे कार्य करून संपत्ती मिळवितो, मानसन्मान मिळवितो तेव्हा त्याच्या अपप्रवृत्तीस भ्रष्टाचार असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटनेत १६१ व्या कलमात, "जो शासकीय सेवक आहे किंव होऊ इच्छितो त्याने आपल्या कायदेशीर वेतनाशिवाय दुसऱ्या व्यक्तीकडून आपल्या कामाबद्दल मान-सन्मानाची अपेक्षा बाळगणे, बक्षिसी स्वीकारणे, त्या मोबदल्यात संबंधित व्यक्तीशी उपकारक वर्तन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय." सत्तेचा गैरवापर, संपत्तीचा अनाठायी व अयोग्य अपव्यय, शासकीय व प्रशासकीय नियमांचे उल्लंघन अशा गोष्टींचा समावेश भ्रष्टाचारात करता येईल. स्वार्थापोटी स्वहितासाठी गैरमार्गाचा वापर करून जेंव्हा संपत्ती मिळविली जाते, मान-सन्मान मिळविला जातो तेंव्हा त्यास भ्रष्टाचार असे संबोधले जाते.

**भ्रष्टाचाराची कारणे :-**

आचार्य कृपलानी यांनी भ्रष्टाचाराची समस्या ही आपल्या सीमा-समस्येपेक्षा अधिक गंभीर स्वरूपाची आहे असे म्हटले होते. पंडित जवाहरलाल नेहरूंनी सुद्धा प्रशासकीय भ्रष्टाचार ही गंभीर स्वरूपाची बाब आहे असे सांगून स्वच्छ निरोगी, कार्यक्षम अशा प्रशासनाची अपेक्षा केली होती. वरील विविध मतांचा परामर्श घेतला असता भ्रष्टाचाराच्या निर्मितीच्या मागे असणाऱ्या विविध कारणांची मीमांसा करणे आवश्यक ठरते.

**१. ऐतिहासिक कारण :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत महसुल, जकात, रेल्वे अशा खात्यात भ्रष्टाचार चालत असे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले आहे. अपात्र, अकार्यक्षम प्रशासनामुळे नवनवीन योजना राबविण्यामध्ये दिरंगाई होऊ लागली आणि बेजबाबदारपणा, निष्क्रियता संपत्तीची अभिलाषा यामुळे प्रशासकीय नोकरात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत गेले.

**२. आर्थिक कारण :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात कल्याणकारी राज्यांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध विकास योजना व कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामुळे प्रशासकीय नोकरांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली व यातून नोकरशाही हा दोष निर्माण झाला. नोकरवर्गाचे हित जोपासण्यासाठी लोकहिताकडे, लोककल्याणाकडे दुर्लक्ष झाले. प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपल्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी भल्या-बुऱ्या मार्गाचा वापर करून संपत्ती मिळवू लागली. सनदी नोकरांना अल्प वेतनामुळे संपत्तीची अभिलाषा होतीच. तुटपुंज्या वेतनात जीवनचरितार्थ चालविणे कठीण होते. त्यामुळे सनदी सेवक भ्रष्टाचाराच्या विकृतीने पछाडून गेला आणि भारतासारख्या विकसनशील देशात सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळत गेला.

**३. सामाजिक कारण :-** भारताचे सारे समाजजीवनच भ्रष्टाचाराने पोखरलेले आहे. भ्रष्टाचार ही भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली कीड आहे. व्यक्ती ही परिस्थितीसापेक्ष असते. परिस्थितीनुसार वास्तवानुसार आपले वर्तन ठेवीत असते. समाजात प्रतिष्ठा मान-सन्मान मिळविण्यासाठी व्यक्ती मग ती सामान्य नागरिक असो किंवा सनदी सेवक असो भ्रष्टाचाराचा मार्ग स्वीकारताना दिसते. तेंव्हा सामाजिक दृष्टीकोनातून भ्रष्टाचाराची कारणमिमांसा होऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणे गरजेचे आहे.

**४. राजकीय प्रभाव :-**

प्रशासनातील सर्व व्यवहारात राजकीय हस्तक्षेपाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागलेले आहे. विशेषतः लोकशाहीच्या विकासीकरणाच्या प्रक्रियेत भ्रष्टाचाराने कळस केलेला आहे. कल्याणकारी राज्य शासनांकडून विविध योजना, प्रकल्प राबविले जातात. अशावेळी राजकीय नेते, लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप करून त्यांना नियमबाह्य वर्तन करावयास लावतात. त्यामुळे प्रशासनाचा मूळ हेतू हा बाजूला सारला जातो. उदयोगपती, भांडवलदार, व्यापारी राजकीय पक्षांना पैसा पुरवितात. नंतर त्या प्रतिनिधीकडून सत्तेचा गैरवापर करून बारेमाप संपत्ती मिळविताना दिसतात अलीकडे साखर घोटाळा, हवाला प्रकरण अशा प्रकरणात सर्वच पक्षांचे प्रतिनिधी कमी अधिक प्रमाणात अडकलेले दिसतात.

**५. प्रशासकीय घटक :-**

सदोष, अकार्यक्षम आणि अयोग्य प्रशासनामुळे भ्रष्टाचार, लाचलुचपत हे दोष निर्माण होतात. अपात्र, अकार्यक्षम नोकरवर्गाची भरती करताना भ्रष्टाचार,लाचलुचपत या मार्गाचा अवलंब केला जातो. लोकप्रतिनिधी, मंत्री राजकीय दबाव आणून आपल्या नातेवाईकांना संबंधितांना पात्रता नसताना नोकऱ्या दिल्या जातात. असा अपात्र, अकार्यक्षम नोकरवर्ग प्रशासनात अयशस्वी, भ्रष्टाचारी बनतो.

**६. सामाजिक परिवर्तनाचा अभाव :-**

भारतात दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, सनातनीवृत्ती यामुळे पाहिजे तेवढया प्रमाणात सामाजिक सुधारणा घडून आलेल्या नाहीत. भारतीय जनतेत निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे असल्यामुळे लोकांना प्रशासकीय न्यायालयीन नियमांची क्लिष्टता, संदिग्धता समजत नाही. त्याचा फायदा सनदी सेवेतील अधिकारी, न्यायाधीश, वकील नेते उठवीत असतात. अडाणी अज्ञानी जनतेचे शोषण करणे हा एक प्रकारचा भ्रष्टाचारच आहे. त्याचबरोबर स्त्रियांना समान दर्जा न देता त्यांना अमानुष वागणूक देणे, देवदासी प्रथा, शक्तिपुजा यासारख्या अनिष्ट प्रथांद्वारे स्त्रियांचे शारीरिक शोषण करणे, हुंडापध्दती/अन्य मार्गाने स्त्रियांचा आर्थिक, मानसिक, शारीरिक छळ करणे यासारखी उदाहरणे अभ्यासली असता "सामाजिक सुधारणेची नितांत गरज भासते." भारतात सामाजिक परिवर्तनाच्या अभावामुळे भ्रष्टाचाराने रौद्र रूप धारण केलेले आहे.

**भ्रष्टाचाराचे निर्मूलन :-**

वास्तविक भ्रष्टाचाराचे स्वरूप समजावून घेताना व्यक्ती कोणत्या कारणामुळे भ्रष्टाचारी वर्तन करते ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. आर्थिक,सामाजिक, राजकीय, नैतिक अशा विविध कारणांमुळे मानवांमध्ये भ्रष्टाचाराची विकृती निर्माण झालेली आहे. सत्तेचा गैरवापर, संपत्तीचा अनाठायी व अयोग्य अपव्यय, शासकीय व प्रशासकीय नियमांचे उल्लंघन अशा गोष्टींचा समावेश भ्रष्टाचारात करता येईल. स्वार्थापोटी, स्वहितासाठी गैर मार्गाचा वापर करून जेंव्हा संपत्ती मिळविली जाते. सत्ता-मानसन्मान मिळविला जातो तेंव्हा त्यास भ्रष्टाचार असे संबोधले जाते. "भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी संयुक्त सदाचार समितीला संदेश पाठविताना म्हटलेले आहे की, भ्रष्टाचार एवढा वाईट आहे की, ज्याच्यावर सर्व बाजूंनी, सर्व पातळयावरून मात केली पाहिजे." शासकीय पातळीवरून भ्रष्टाचाराचे निर्मूलन

**१. केंद्रीय सतर्कता आयोग :-**

संथानम् समितीच्या शिफारशींनुसार भारत सरकारने केंद्रीय सतर्कता आयोगाची स्थापना १९६४ मध्ये केली. केंद्रीय सतर्कता आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक राष्ट्रपतीकडून केली जाते. याशिवाय आयोगात एक सचिव, एक विशेष अधिकारी, एक तांत्रिक मुख्य आयुक्त, तीन विभागीय चौकशी आयुक्त, दोन कनिष्ठ सचिव आणि ६ तांत्रिक आयुक्त असे अधिकारी नियुक्त केले जातात. आयोगाची मुदत ६ वर्ष असते.

**कार्ये :-**

१. सनदी सेवेतील अधिकाऱ्यांसंबंधी भ्रष्टाचाराचा आरोप किंवा शंका घेतल्यास त्याची चोकशी करणे.

२. सनदी सेवकाने आपल्या अधिकाराचा वापर करून भ्रष्टाचार केला असेल तर त्यासंबंधी चौकशी करणे.

३. भ्रष्टाचार प्रतिबंधक कार्यावर देखरेख, नियंत्रण करणे.

४. भ्रष्टाचार, लाचलुचपत या संबंधी जनतेने केलेल्या तक्रारींची चौकशी करणे.

५. प्रशासकीय सेवेत एकात्मता, समन्वय साधून प्रशासकीय कार्यपध्दतीत सुधारणा, शिफारशी करणे.

केंद्राप्रमाणेच प्रत्येक घटक राज्यात सतर्कता आयोग स्थापन

केला जातो. राज्याच्या कार्यक्षेत्रापुरते या आयोगाचे कार्य मर्यादित असते. तसेच जिल्हा पातळीवर विभागीय सतर्कता आयोगाची यंत्रणा निर्माण केली जाते. जिल्हा पातळीवर सतर्कता निरीक्षक अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली कार्य चालते. अशा प्रकारे केंद्रीय, प्रांतीय आणि जिल्हा पातळीवर सतर्कता आयोगाचे कार्य चालू असते.

**मंत्रालयातील सतर्कता-संघटन:-**

संथानम् समितीच्या शिफारशीनुसार प्रत्येक शासकीय खात्या सतर्कता संघटन झाले पाहिजे. खात्याच्या कार्यात संघटन, एकात्मता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने खात्याच्या प्रमुख सचिवाला मुख्य सतर्कता-अधिकारी नेमला पाहिजे. या सतर्कता अधिकाऱ्याद्वारे केंद्रीय सतर्कता आयोग व खाते यात संबंध निर्माण होऊन भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य सुलभ होऊ शकेल. खात्याच्या मुख्य सतर्कता अधिकाऱ्याची नेमणूक केंद्रीय सतर्कता आयोगाशी सल्लामसलत करून केली जाईल. त्याच्या मदतीला सतर्कता अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. खात्यांच्या मुख्य सतर्कता अधिकाऱ्यांच्या कार्यावर देखरेख, नियंत्रण व परीक्षण करण्याचा अधिकार केंद्रीय सतर्कता आयोगाला असतो. अशा प्रकारे सर्व मंत्रालयाच्या मुख्य सतर्कता अधिकाऱ्याद्वारे भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य सुसंघटितपणे चालू राहते.

**विशेष पोलीस संघटन (आस्थापना) :-**

१९४१ साली केंद्र सरकारने विशेष पोलीस व्यवस्था हा विभाग स्थापन केला.पुढे १९४६ साली दिल्ली विशेष पोलीस आस्थापना कायदा पास झाल्यामुळे ग्रहखात्याच्या नियंत्रणाखाली संपूर्ण देशात व केंद्रशासित प्रदेशात विशेष पोलीस आस्थापना या विभागाचे कार्य या कायद्यानुसार चालू झाले. १९६३ साली Central Bureau of Investigation (C.B.I.) या विभागाची स्थापना करण्यात आली आणि विशेष पोलीस आस्थापना हा विभाग सी.बी.आय.चा एक भाग मानण्यात येऊ लागला. C.B.I. कडून महत्वाच्या गुन्ह्यांची चौकशी केली जाते. केंद्रीय तथा राज्य पातळीवरील सेवक वर्गाकडून होणाऱ्या भयंकर स्वरूपाच्या भ्रष्टाचाराची लाचलुचपतीची प्रकरणे या विभागाकडून हाताळली जातात. सार्वजनिक उदयोगांतील भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळण्याचे कार्य सी.बी.आय.कडून होत असते.

केंद्रीय सतर्कता आयोगाने केलेल्या नियमानुसार, आदेशानुसार CBI ला काम करावे लागते. पूर्वी CBI कोणत्याही खात्यातील भ्रष्टाचाराची प्रकरणे त्या खात्याच्या प्रमुखाची परवानगी न घेता हाताळीत असत.परंतु आता खात्याच्या प्रमुखाची परवानगी घेतल्याशिवाय CBI चौकशी करता येत नाही किंवा गुन्हा नोंद करता येत नाही. या नव्या नियमामुळे CBI च्या अधिकार क्षेत्रावर मर्यादा येऊन पडली आहे आणि गुन्हेगारांना संरक्षण मिळू लागले आहे.बदनाम, भ्रष्टाचारी, लाचखाऊ अधिकाऱ्यांना अप्रत्यक्षपणे संरक्षण देण्यात आले आहे. असे म्हणता येईल. तेंव्हा CBI या विभगाला निर्भिडपणे व स्वतंत्रपणे कार्य करता येईल असे नियम करणे गरजेचे आहे. थोडक्यात! भारत सरकारच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे भ्रष्टाचार निर्मूलनासाठी शासकीय पातळीवरून उपाययोजना करताना लागणाऱ्या तरतुदींची, नियमांची आणि व्यवस्थांची परिपूर्तता योग्य प्रकारे होणे गरजेचे आहे.

**सारांश :-** भ्रष्टाचाराची चौकशी, संबंधित गुन्हेगारांना शिक्षा त्या शिक्षेची अंमलबजावणी या संदर्भात केली जाणारी व्यवस्था अधिक अद्ययावत व स्वतंत्र असणे गरजेचे आहे. भ्रष्टाचारी वर्तन ही एक मानसिक विक्रती आहे. स्वार्थ लोभ अभिलाषा यामुळे व्यक्ती भ्रष्टाचारी बनते.सत्तेचा आणि सार्वजनिक संपत्तीचा गैरवापर करते.तेंव्हा ती विक्रती नष्ट करणे गरजेचे आहे. देशातील जनता जेवढी सुजाण, सुसंस्कृत सतृशील असेल तेवढया प्रमाणात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आढळते. तेंव्हा साक्षरता, सुजाणता, नैतिकता या दृष्टीने समाजसुधारणा व परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. भ्रष्टाचार ही अनिष्ट वाईट प्रवृत्ती आहे. सदाचार, सद्वर्तन ही चांगली प्रवृत्ती आहे. अशी धारणा. मनोभावना जनतेत निर्माण होणे गरजेचे आहे. स्वकल्याण, स्वहित यापेक्षा समाजकल्याण, समाजहित अशी विचारसरणी प्रत्येक नागरिकात निर्माण होणे गरजेचे आहे. तेंव्हा सार्वजनिक पातळीवरून भ्रष्टाचार निर्मूलन होण्यासाठी लोक जागृती होणे गरजेचे आहे. राजकीय नेते मंत्री, सनदी सेवक आणि जनता या सर्वांनी मिळून भ्रष्टाचारा विरोधी आंदोलन उभारले पाहिजे. शासकीय आणि सार्वजनिक अशा दोन्ही पातळीवरून लोकजागृती घडवून आणली तरच भ्रष्टाचार निर्मूलन शक्य आहे. अर्थात भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य हे दीर्घकालीन स्वरूपाचे कार्य असते हे विसरून चालणार नाही. भ्रष्टाचार विरहित समाजरचना निर्माण करण्यासाठी लोकांचे ऱ्हदय परिवर्तन होणे आवश्यक आहे. ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया भविष्यकाळातील काही पिढयांमध्ये सातत्याने होत राहिल्यास भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणे शक्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


१. लोकप्रशासन-प्रा.बी.बी.पाटील-फडके प्रकाशन.

२. कार्यालयीन प्रकाशन-प्रा.डॉ.बि. वशिष्ट बन-अरूणा प्रकाशन.

३. कार्यालयीन प्रकाशन-प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता-अरूणा प्रकाशन.

४. मानव संसाधन व्यवस्थापन - प्रा.डॉ.जी.आर.कत्तूरवार ओमसाई प्रकाशन, देगलूर.


❑❑❑

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शेतीवर आधारीत उद्योगधंदा<br>**डॉ. सुभाष प्रभू राठोड** | १-४ |
| २ | भारतीय शेती व कमी उत्पादकतेची कारणे<br>**प्रा. डॉ. बी. आर. शिंदे** | ५-७ |
| ३ | जागतीकीकरण आणि भारतीय शेती व्यवसाय<br>**प्रा. डॉ. शिवांगी संजयराव दहिटणकर** | ८-१० |
| ४ | सेंद्रीय शेती<br>**डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर** | ११-१३ |
| ५ | शाश्वत कृषी विकास आणि सेंद्रिय शेती<br>**डॉ. सुभाष रा. यादव** | १५-१८ |
| ६ | भारतीय शेतीची उत्पादकता : एक अभ्यास<br>**प्रा. दिनकर टकले** | १९-२२ |
| ७ | भारतीय शेतीचा शाश्वत विकासात पायाभुत सुविधाचे योगदान<br>**प्रोफेसर डॉ. के. के. पाटील**<br>**सतिश दिलीपराव तोडकर** | २३-२६ |
| ८ | वातावरण बदलाचे शेतीवरील परिणाम<br>**डॉ. विश्वनाथ कांक्कर** | २७-२९ |
| ९ | कृषी आणि शाश्वत विकास<br>**अप्पाराव वागडव** | ३०-३२ |
| १० | हरितक्रांतीचे परिणाम<br>**डॉ. नंदकिशोर मुळे** | ३३-३५ |
| ११ | शाश्वत शेती काळाची गरज<br>**चंद्रकांत रामराव वलाकटे** | ३६-४० |
| १२ | शेती व्यवसायातील शाश्वत विकास समस्या आणि उपाय<br>**प्रा. विठ्ठल जी. चव्हाण** | ४१-४४ |
| १३ | शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे<br>**भगवान विष्णु शिंदे** | ४५-४७ |





Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ५. शाश्वत कृषी विकास आणि सेंद्रिय शेती

**डॉ. सुभाष रा. यादव**
विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी.

शाश्वत म्हणजे स्थिर चिरकाल टिकणारा, सतत चालू राहणारा, भविष्य आश्वस्त करणारा म्हणजेच चालूपिढीच्या गरजाची पुर्तता करताना नैसर्गिक संसाधने शुध्द व सुरक्षित राहतील व भावी पिढीच्या उपभोगावर परिणाम करणार नाहीत याचा विचार करून नैसर्गिक संसाधनाचा वापर महत्तम उपयोगीता देणारा असावा परंतू आज औद्योगीककरणाच्या आणि जलद आर्थिक विकासाच्या नावाखाली बेसुमार व अकिफायतशीर नैसर्गिक संसाधनाचा वापर व नासाडी मोठया प्रमाणावर चालू आहे. परीणाम स्वरूप हवा पाणी प्रदुषीत होवून निसर्ग साखळी कोलमडण्याची भिती वाढत आहे.

मानवाने आपल्या बुध्दीचातुर्याने अनेक नविन नविन शोध लावले. आपल्या बुध्दीचातुर्याने तो चंद्रावर मंगळावर पोहोचला. सातत्याने नविन नविन संशोधनातून शोध लावत आहे. त्याच्या साहयाने आपले जीवन अधिकाधिक सुखी समाधानी आणि आल्हाददायक करत आहे. परंतु हे करत असताना पर्यावरणीय दृष्टीने विचार होणे जरूरी आहे की जेणेकरून निसर्गसाखळी असंतुलीत होणार नाही. परंतु असे होताना दिसत नाही.

आर्थिक विकासाच्या प्रकियेत कृषी उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास प्राधान्य कमाने येतात. आज जगात जी विकसित राष्ट्रे म्हणून ओळखली जातात त्या राष्ट्रात प्रथम कृषी विकास व नंतर औद्योगिक व सेवांक्षेत्राचा विकास झाला. परंतु जगाच्या पाठीवर कोणत्याही देशांने शाश्वत विकासाकडे पाहिले नाही. कृषी उत्पादन वाढीसाठी सुधारीत बि–वियाणे, रासायनिक खते आणि किटकनाशकाचा मोठया प्रमाणावर वापर केला गेला याला भारतही अपवाद राहिला नाही. भारतातही हरितकांतीच्या नावाखाली मोठया प्रमाणावर हा कार्यकम चालू राहिला. 1960–70 या दशकातील वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजे पोटी तो चांगलाही वाटला परंतु आज नापिक होत चाललेल्या जमिनी, हवा पाण्यातील प्रदुषण, वाढता उत्पादन खर्च, घटते उत्पादन, अन्नधान्य सेवनाचा मानवी आरोग्यावर होत चाललेला विघातक परिणाम आणि शेतकऱ्याच्या आत्महत्या याचा विचार केला तर आपण निश्चितच कुठेतरी चुकत आहोत आणि आपल्याला आता मार्ग बदलण्याची वेळ आली आहे.

**सेंद्रिय शेती काळाची गरज**

उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे पुर्वी मोठया अभिमानाने म्हटले जायचे परंतु आज शेती म्हणजे स्वतःच्या सापळयात स्वतःच अडकत जाणे आणि शेवटी आत्महत्या करणे अशी शेती करणाऱ्यांची अर्थात शेतंकऱ्याची अवस्था झाली आहे. विदर्भ, मराठवाडा, राज्य आणि देशात दररोज शेतकरी आत्महत्या करत आहेत. सरकार बदलले परंतु शेतकरी आत्महत्येचे सत्र थांबले नाही उलट त्याने वेग घेतला. शेतकरी आत्महत्येची कारणे वेगवेगळया जिल्हयात आणि भागात वेगवेगळीही असतील परंतु शेतकरी आत्महत्येचे प्रमुख कारण हे दारिद्रय आणि कर्जबाजारीपणा हेच आहे यात कसल्याही प्रकारची शंका नाही. शेतकऱ्यांच्या दारिद्रय आणि कर्जबाजारी पणाचे नेमके कारण म्हणजे रासायनिक खते, सुधारीत बि बियाणे व किटकनाशकाच्या अमर्याद वापरामुळे वाढता उत्पादनखर्च व तसेच लहरी हवामान, शासनाची चुकीची धोरणे, सदोष बाजार यत्रंणा इत्यादी मुळे उत्पादन व उत्पन्नाची हमी नाही.

त्याचबरोबर रासायनिक खते, सुधारीत बि बियाणे व किटकनाशकाच्या अतिरेकी उपयोगातुन निर्माण होणाऱ्या उत्पादनाचा होणारा आरोग्यावरील दुष्परिणाम या सर्वानवर वरील प्रबळ उपाय म्हणजे सेंद्रिय शेती होय.

प्रस्तुत शोधनिबंधात सेंद्रिय शेतीचे महत्व, फायदे, सेंद्रिय शेती समोरील आव्हाने आणि उपाय योजना इत्यादी बाबीचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. राज्यात सेंद्रिय शेतीसाठी अनुकुल/प्रतिकुल स्थितीचा आढावा घेणे.
2. राज्यातील सेंद्रिय शेतीच्या फायद्या तोटयाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती**

उपरोक्त संशोधन लेखनासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, वेबसाईट इ. माहिती प्राप्त करण्यासाठी उपयुक्त ठरले आहेत.

**सेंद्रिय शेती**

सेंद्रिय शेती म्हणजे सजीव पर्यावरणीय रचना आणि जीवनचकास समजून घेऊन व रसायनाचा वापर टाळुन केलेली एकात्मिक शेती पध्दती होय. देशात सिक्कीम सरकारने 2015 पर्यंत संपुर्ण राज्य सेंद्रिय शेतीखाली आणण्याचे उद्दिष्टये ठरविले होते आज जगात 110 पेक्षा अधिक देशामध्ये सेंद्रिय शेती केली जात असून दिवसेदिवस सेंद्रिय शेतीचा हिस्सा वाढत आहे. थोडक्यात सेंद्रिय शेती म्हणजे आपली पंरपरागत शेतीच पण याला पर्याप्त मात्रेत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देवून रसायनाचा कमीत कमी वापर करणे किंवा न करणे म्हणता येईल. आपली पंरपरागत शेती इंग्रज राजवटीपुर्वी खरोखरच संपन्न होती. जगात शेतीचा शोध 10,000 वर्षापुर्वी लागला असे म्हटले जाते आणि भारतात शेती ही 6500 वर्षापासून केली जाते. रशियन वनस्पती शास्त्रज्ञ निकोलाय व्हॅव्हिलॉव्ह यांच्या मतानुसार जगात पिकाची जी मुख्य आठ स्वतंत्र उगमस्थाने आहेत त्यात भारत–म्यानमार हा प्रदेश देखील आहे. याचा अर्थ आपल्या देशात अनेक प्रजातीचे बियाणे आहेत त्यांचे परंपरागत पध्दतीने संगोपन करणे म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणे असा नव्हे केवळ रसायनाचा वापर टाळणे कि जेणे करून मानवी आरोग्य व जमिन, पाणी, हवा, पर्यावरणीय आरोग्य धोक्यात येणार नाही. अनुभव व नविन नविन प्रयोगाच्या माध्यमातून आपल्याला उत्पादनात वाढ करता येणे शक्य होईल.

देशात सर्व प्रथम गहु आणि तांदुळ उत्पादनात पंजाब आणि हरियाणा या राज्यात हरित क्रांती झाली परंतु आज पंजाब आणि हरियाणा हि राज्य कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने त्रस्त आहेत. कॅन्सरग्रस्त एरिया म्हणून ओळखले जात आहेत. सेंद्रिय शेतीचे हवा, पाणि, माती, धान्याची रोपे, पशु, पक्षी, मनुष्यप्राणी व निसर्गचक्र इत्यादीच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. सेंद्रिय शेती करत असताना कोणत्याही रासायनिक गोष्टीचा वापर केला जात नाही. त्यामुळे सेंद्रिय पध्दतीच्या शेतीतील अन्नधान्य आरोग्याच्या दृष्टीने उत्तम आहे म्हणूनच आज सेंद्रिय शेतीच्या मालाला रासायनिक शेतीच्या उत्पादनापेक्षा चारपाच पट अधिक किंमत प्राप्त होत आहे.

सेंद्रिय शेती निसर्ग नियमानुसार व निसर्गाला अनुसरून असल्यामूळे कोणत्याही जीवसृष्टीला बाधा पोहोचत नाही.

**सेंद्रिय शेतीचे फायदे**

1. शेतीसाठी लागणाऱ्या बंहुतांश निविष्ठा (बियाणे, खते व किटकनाशके) शेतकऱ्यांना बाजारातून विकत घ्याव्या लागतात. एक प्रकारे शेतीचे बाजारीकरण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्याची व्यापाऱ्याकडुन होणारी लुट थांबेल व मोठया प्रमाणावर खर्चात बचत होईल.
2. जमिनीची होत चाललेली धुप, क्षारवड होत चाललेली जमिन व सेंद्रिय कर्बाचे कमी होत चाललेले प्रमाण थांबुन जमिनीच्या नैसर्गिक सुपीकतेत वाढ घडून येईल.
3. रसायनाच्या अति वापरामुळे जमिन, पाणि व हवा यांचे प्रदुषण विषाक्त झालेली अन्नसाखळी त्यामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळता येतील.

असे कितीतरी फायदे शेतकरी, अखिल मानव जात व राष्ट्राच्या दृष्टीने सेंद्रिय शेतीचे फायदे आपणास दिसून येतात. परंतु भारतासारख्या विशाल लोकसंख्या असणाऱ्या देशात सेंद्रिय पध्दतीने शेती केल्यास अन्नधान्य पुरेल का यासारखे काही प्रश्न आपणास पडतात त्याचा थोडक्यात आढावा घेवू.

**सेंद्रिय शेतीच्या समस्या**

1. आजच्या तंत्रज्ञान युगात मानव एवढा आळशी झालेला आहे की प्रत्येकाची **देरे हरी पलंगावरी** अशी स्थिती झाली आहे. सेंद्रिय पध्दतीची शेती म्हटली की गुरे ढोरे आली. त्यांचा चारा पाणि आला. गोमुत्र, शेण जमा करणे आले. एकंदरीत खते, औषधे बियाणे तयार करणे आले. या गोष्टी प्रत्येक शेतकऱ्याला स्वतः कराव्या लागतील. परंतु आज शेतकरी या सर्व गोष्टीसाठी बाजाराकडे पाहतो त्यामुळे हे जमेल का ? प्रश्न आहे.
2. सेंद्रिय शेतीच्या प्रतिसादासाठी वेळ लागतो तो वेळ आपणाकडे आहे का ? याचा विचार करावा लागतो. शेतकऱ्याची आर्थिक स्थिती फार बेताची असते. त्यामुळे सेंद्रिय शेतीच्या यशस्वीतेची शंका येते.
3. आज ही देशात निरक्षरतेचे प्रमाण 25 % आहे. त्यातही बहुसंख्य शेतकरी निरक्षर आहेत. सेंद्रिय पध्दतीने शेती म्हणजे पंरपरागत शेती नव्हे तर शास्त्रीय पध्दतीने शेती होणे आवश्यक आहे. शेतकऱ्याना समजत नाही, किया पकिया स्मरणात राहत नाहीत त्यामुळे हे जमेल का ? हा प्रश्न आहे.
4. शेतीतील श्रमाला प्रतिष्ठा नाही. सुशिक्षित माणुस शेतीकडे वळत नाही.
5. मोठया प्रमाणावर अल्पभुधारक शेतकरी आहेत. अल्पभुधारक शेतकऱ्याना एकतर शेती परवडत नाही. त्यामुळे ते शेती न करता शहराच्या ठिकाणी जाऊन नोकरी करणे पसंद करतात. अशा शेतकऱ्याच्या शेतीमध्ये खंडकरी शेतकरी सेंद्रिय पध्दतीने शेती कितपत करेल हा प्रश्न आहे.

याशिवाय भांडवलाचा अभाव, सिचंनविषयक सोयी सुविधा, पशुधनाचे पालन पोषण इत्यादी प्रश्न सेंद्रिय शेती समोर असल्याचे दिसुन येते.

देशात 1965–66 मध्ये हरितक्रांतीला सुरूवात झाली. 1950 मध्ये देशातील कृषी उत्पादन 5.2 कोटी मेट्रीक टन होते. ते 2013 साली 26.3 कोटी मेट्रीक टनापर्यंत पोहोचले. हे जरी खरे असले तरी सुधारीत बिबियाणे, रासायनिक खते व किटकनाशकाच्या वापरामुळे सुरूवातीचे 20–25 वर्ष उत्पादन वाढताना दिसले परंतु जमिनीला केवळ नत्र, स्फुरद व पालाश या तीन प्रकारची पोषक द्रव्ये पुरवत राहिल्याने इत्तर आवश्यक पोषकतत्वाची जमिनीत कमतरता निर्माण झाली. उत्पादन पातळी कायम ठेवण्यासाठी जास्त रासायनिक खते, जास्त किटकनाशकाचा वापर परीणाम स्वरूप या बाहय निविष्टांचे भाव वाढत गेले. भांडवली खर्च वाढला. शेतमालाचे भाव मात्र वाढले नाहीत व बहुपिक पध्दतीकडुन कापुस सोयाबीन या एकलपिक पध्दतीकडे वळलो. परिणाम स्वरूप शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती

विघडत गेली. शासकिय आकडेवारी नुसार 1995—2013 या 18 वर्षाच्या काळात देशात 2,84,696 शेतकऱ्यानी आत्महत्या केल्याची नोंद आहे. एका अभ्यासानुसार देशात दर दोन तासाला दोन शेतकरी आत्महत्या करतात. देशातील 70 % महिला व बालके कुपोषणाचे बळी आहेत तर 42 % बालके कमी वजनाची आहेत. याचा अर्थ देश गहु तांदळाच्या बाबतीत स्वयंपुर्ण झालेला दिसत असला तरी जनतेला पोषणयुक्त आहार पुरविण्याच्या बाबतीत आपले शेती व्यवस्थापन खुपच मागे पडले आहे.

यावरून स्पष्ट होते की सुधारीत बिबियाणे, रासायनिक खते व किटकनाशके इत्यादीचा वापर करून आपण अन्नधान्य उत्पादनात स्वयंपुर्ण झालो असलो तरी शेतकरी आणि ग्रामीण विकास यात कमी पडलो आहोत. कल्याणकारी लोकशाही राज्यात सर्वांना न्याय व सन्मानाच जीवन जगता येण्यासाठी तसेच पर्यावरणीय समतोल, वाढते प्रदुषण, विषमुक्त अन्नसाखळी यासाठी शास्त्रीय पध्दतीने सेंद्रिय शेती हा कार्यक्रम घेवून यशस्वी करणे सर्वांच्या हिताचे ठरेल. म्हणून सेंद्रिय शेतीच्या यशस्वीतेसाठी उपाय पुढीलप्रमाणे सुचवू इच्छितो.

**सेंद्रिय शेती पध्दती यशस्वीतेसाठी उपाययोजना**

1. सेंद्रिय पध्दतीच्या शेतीमध्ये स्थानिक परिस्थितीशी सुसंगत काटक बियाणे, सेंद्रिय खते आणि सेद्रिय पीक संरक्षणाची पध्दती यांची भुमिका महत्वपुर्ण आहे परंतु दुर्देवाने यापैकी कशातही फारसे संशोधन झालेले नाही. झालेले संशोधने स्थानिक पातळीवरच मर्यादित राहतात. यासाठी शासन स्तरावर मोठे प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.
2. सेंद्रिय पध्दतीच्या विविध खत निर्मितीच्या प्रकियाचे प्रशिक्षण शेतकऱ्याना देण्यात यावे.
3. शेतकऱ्याचा शेतीवरील मालकी हक्क सुरक्षित ठेवून औद्योगिक कंपन्याना भागीदारी किंवा करार पध्दतीने शेती करण्यासारखी परिस्थिती निर्माण करावी.
4. कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना सन्मानजनक वेतन देऊन त्यांची कार्यक्षमता कृषी उत्पादन वाढीसाठी उपयोगात येईल यासाठी प्रयत्न करावा.
5. पशुधन पालनासाठी कर्ज अनुदान यासारख्या योजनाचा अंवलब करावा.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात शेती पध्दती यशस्वी करणे आव्हान आहे कारण आजही शेती व्यावसायिक दृष्टीकोनातून फारशी केली जात नाही. तसेच सेंद्रिय शेतीची उत्पादकता अधिक असल्याचे प्रमाणित झालेले नाही. परंतु भुसंवर्धन आणि विषयुक्त अन्नसाखळी या दृष्टीने देशात सेंद्रिय शेती यशस्वी होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१. https://www/loksatta.com.>विशेष – 02 एप्रिल 2017
२. www.bhusanwardhan.com>Home>इतर 24 जुलै 2018
३. Prahaar>uncategorized 24 मे 2018
4. https://mr.m.wikipedia.org.wiki>शेती
5. Marathi.destatalk.com>sustainable. Agriculture. 20 August 2015.
6. कृषी अर्थशास्त्र – विजय कविमंडन

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
**RESEARCH JOURNEY**
UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
23 March 2019, Special Issue- 168 (II)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co-Editor**
Dr. Bonnar R.Y.
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Prof. Sonner V.B.
Dept. of Political Science
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

21. "भारतातील नक्षलवादी चळवळ: महाराष्ट्रात नक्षल्यांचा शिरकाव आणि राज्यसरकारचे नक्षलविरोधी प्रयत्न" 64
प्रा.भारतभुषण वामणराव बाळबुधे
22. जागतिकीकरण व भारतीय शेतकरी 68
डॉ. सुभाष रामराव यादव
23. राष्ट्रीय आणि वैश्विक एकात्मतेत संगीताची भूमिका 71
प्रा. डॉ. अर्चना संदीप देशपांड
24. जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था 74
प्रा. निलेष अरूण दूर्गे
25. जागतिकीकरण आणि मूलींचे शिक्षण 78
जवळेकर रूपाली वसंतराव
26. जागतिकीकरण आणि भारतातील नक्षलवाद 80
प्रा.कांबळे शिवाजी ई.
27. तथागत बुध्द आणि ताण तणाव व्ययस्थापन 84
डॉ. बालाजी मा. गव्हाळे
28. जागतिकीकरण आणि मूल्यशिक्षण 88
किर्तीराज चंद्रभानजी लोणारे, प्रा.डॉ. संघमित्रा गोणारकर
29. जागतिकीकरण आणि नागरी परिवर्तन ९०
प्रा. डॉ. प्रशांत मेने
30. जागतिकीकरण – सामाजिक व कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम 95
प्रा. डॉ.दिपक सांबाप्पा देशमाने
31. जागतिकीकरण आणि वंचित समाज 99
प्रा.डॉ.नरवाडे भास्कर विठ्ठलराव
32. पंडित नेहरूच्या नेतृत्वाखालील भारताची अलिप्ततावादी नीती – एक दृष्टीक्षेप 101
प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे
33. जागतिकरण आणि भारतीय स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग 104
प्रा. गजानन बाबुराव मरगीळ
34. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम 106
प्रा.गडदे भारती बाबूराव
35. वैश्विक युग बोध की अभिव्यक्ति : तसलीमा नसरीन की कविता ('यह दुख : यह जीवन' के विशेष संदर्भ में) 109
प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश
36. जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने 111
प्रा.डॉ.रामचंद्र गायकवाड
37. जागतिकीकरण व भारताचे आण्विक धोरण 114
प्रा. रामकिशन सखाराम आवाड
38. मानसशास्त्रातील संधी आणि प्रचलित कल 117
प्रा. डॉ. जी.पी. वायकोस
39. जागतिकीकरण आणि दलित–आदिवासी कविता 119
डॉ. शत्रुघ्न जाधव
40. मानसिक आरोग्य आणि ताण–व्यवस्थापन 123
प्रा. डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे
41. जागतिकीकरणाचे भारतीय उद्योगावरील परिणाम 125
लोडे परमेश्वर लिंबाजी

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# जागतिकीकरण व भारतीय शेतकरी

डॉ. सुभाष रामराव यादव
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड. जि. परभणी

---

**प्रस्तावना**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला आणि पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातून 1951 पासून नियोजनात्मक आर्थिक विकासाला प्रारंभ केला. पहिली पंचवार्षीक योजना कृषी क्षेत्राला प्राधान्य देणारी होती आणि ती यशस्वीही झाली. 1955–56 मध्ये भारत अन्न धान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला याचा परीणाम नियोजन कर्त्यांनी आपला मोर्चा दुसऱ्या पंचवार्षीक योजनेत औद्योगीक क्षेत्राकडे वळविला. भारतात हरित कांती झाली. श्वेत कांती, औद्योगीक क्षेत्र, सेवा क्षेत्र, दुरसंचार माहिती तंत्रज्ञान इ. बाबत गगन भरारी घेतली. लोकाच्या जीवनमानात सुधारणा झाली. अब्जाधिशाच्या संख्येत वाढझाली. परंतू शेती क्षेत्र आणि शेतकऱ्याची धुळधाण झाली. शेती आणि शेतकऱ्यांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. शेतकरी नागवला गेला आणि देशात शेतकरी आत्महत्येचे सत्र जोमाने सुरू झाले. हे कृषीप्रधान आणि 70 टक्के पेक्षा अधिक लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असणाऱ्या देशाच्या हिताच्या दृष्टीने तर चांगले नाहीच परंतू हि लाजीरवाणी आणि शरमेने मान खाली घालायला लावणारी बाब आहे.

प्रस्तूत शोधनिबंधात भारतात जागतिकीकरण प्रकियेने वेग घेतला असून या प्रकियेत भारतीय शेती आणि शेतकरी टिकेल का ? याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी जागतिकीकरणाचा अर्थ, शेतकरी, शेतीक्षेत्र इत्यादीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जागतिकीकरण :–**

भारतात जागतिकीकरण प्रकियेला खऱ्या अर्थाने तेव्हाचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांच्या साक्षीने 1990 मध्ये सुरुवात झाली.

जगतिकीकरण म्हणजे विविध देशामध्ये माहिती तत्रंज्ञान, भांडवल, लोक, बाजारपेठा, वस्तु यांचा मुक्तसंचार आणि देवाणघेवाण होय. यामूळे देशोदेशीच्या अर्थव्यवस्थापरस्पराशी जोडल्या गेल्या आहेत. जग हे कुंटूब झाले आहे. जागतिकीकरण म्हणजे स्पर्धा आणि स्पर्धा म्हणजे अशी स्पर्धा कि ज्याची क्षमता असेल तो टिकेल अशा या जागतिकीकरण प्रकियेत टिकण्यास भारतीय कृषीक्षेत्र व शेतकरी सक्षम आहेत का ?

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

1. भारतीय कृषी क्षेत्राचा आढावा घेणे.
2. भारतीय शेतकरी व शेतकऱ्याच्या आर्थिक व शैक्षणीक स्थितीचा आढावा घेणे.

**गृहितके :–**

1. जागतिकीकरण प्रकियेत शेतकऱ्याची आर्थिक स्थिती खालावली आहे.
2. जागतिकीकरण प्रकियेत शेती व शेतकरी टिकविण्यात शेतकऱ्याचे अज्ञान व निरक्षरता हेच प्रमूख अडथळे आहेत.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तूत शोधनिबंधात प्रामुख्याने दुय्यम साधन सामग्रीचा म्हणजे शासनाचे अहवाल, लेख, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इत्यादीचा वापर केला आहे.

भारत देश क्षेत्रफळाने जगात 7 व्या कंमाकावर असला तरी भारतातील 53 टक्के क्षेत्र शेती योग्य आहे. जगातील शेती योग्य क्षेत्राचा विचार करता चीन, ऑस्ट्रेलिया, रशिया यांचे शेती योग्य क्षेत्र अनुक्रमे 11.9 टक्के, 6.43 टक्के, 7.43 टक्के याचा अर्थ इतर देश क्षेत्रफळाने मोठे असले तरी भारत देश शेती योग्य जमिनीच्या प्रमाणात अग्रेसर आहे. कृषी उत्पन्नाच्या बाबतीत मात्र प्रथम कंमाकावर असणाऱ्या चीनच्या उत्पन्नाच्या निम्मपटीने कमी आहे. मनुष्यबळ संख्या जगात दुसऱ्या कंमाकाची आहे. शेतीसाठी भारतातील जमीन सुपीक आहे. पर्जन्यमानाच्या कमवारीत 9 व्या कंमाकावर आहे. इतर राष्ट्राशी तुलना करता भारतातील शेतीशी सर्व गोष्टी अनुकुल असताना भारतातील कृषी उत्पादकता पिक निहाय इतर राष्ट्राशी तुलनात्मक दृष्टया अल्प आहे.

**तक्ता कं. 1**

पिकनिहाय कृषी उत्पादन भारत व अग्रेसर देश (प्रतिहेक्टर टनामध्ये)

| अ.कं. | पिक | उत्पादन | उत्पादन | अग्रेसर देश |
|---|---|---|---|---|
| 1 | तांदूळ | 3.3 | 10.8 | ऑस्ट्रेलिया |
| 2 | गहू | 2.8 | 8.9 | नेदरलॅंड |
| 3 | ऊस | 66 | 125 | पेरू |
| 4 | केळी | 37.8 | 59.3 | इंडोनेशिया |
| 5 | बटाटा | 19.9 | 44.3 | टमेरिका |
| 6 | भाजीपाला | 13.4 | 76.8 | टमेरिका |
| 7 | टोमॅटो | 19.3 | शतपटीने अधिक | बेल्जीयम |
| 8 | सोयाबीन | 1.1 | 3.7 | टर्की |

संदर्भ – विष्णूकांत बोरसे, अभ्यासक ई कल्चर टेक्नॉलॉजी

भारतातील कृषी उत्पादन काही प्रमुख पिकाचे अग्रेसर राष्ट्राच्या तुलनेत पाहिले असता खुपच कमी असल्याचे दिसून येते. प्रति हेक्टरी उत्पादन कमी याचा अर्थ सरासरी उत्पादन खर्च अधिक.

**साक्षरता प्रमाण :–**

निरक्षरता हा मानवाच्या जीवनातील सर्वात मोठा अभिशाप आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख किंवा लिहता वाचता येणे किंवा पदवी संपादन करणे नव्हे तर हक्क कर्तव्य अधिकार याची जाणीव, कौशल्य विकास, समाजात विकासाकरीता योगदान देण्याची भावना निर्माण करणे म्हणजे साक्षरता होय. सर्वांगीण विकासाची साक्षरता हि मुख्य आधारशिला आहे. भारताच्या बाबतीत उच्चशिक्षीतामध्ये हे गुण अभावानेच दिसून येतात.

जगात चीन, फ्रान्स, जर्मनी, इटली, नेदरलॅंड, स्वीडन, युके, युएस या देशाचे साक्षरतेचे प्रमाण 99 टक्के पेक्षा अधिक तर अर्जेंटिना 98 टक्के ब्राझील 93 टक्के आणि भारताचे 86 टक्के 2015 मध्ये होते. इतर राष्ट्राच्या तुलनेत भारतात निरक्षराचे प्रमाण अधिक असून महत्तम निरक्षर लोक हे कृषी व कृषी क्षेत्राशी संबधीत आहेत किंवा कृषी क्षेत्रात आहेत.

**शेती :–** शेती म्हणजे अन्न, तंतू प्राणी, वनस्पती यांचे व्यवस्थापीत उत्पादन.

शेतकरी म्हणजे अन्न, तंतू, प्राणी, वनस्पती यांचे व्यवस्थापीत उत्पादन करण्याच्या प्रकियेतील एक, अनेक किंवा सर्व प्रकियेचा भाग किंवा सर्व प्रक्रिया घडवून आणणारी व्यक्ति किंवा संस्था होय.

सन 2000–01 मधील कृषी जनगणनेनुसार 121 दशलक्ष जमीनधारकापैकी 99 दशलक्ष जमीनधारक हे लहान व किरकोळ होते. सकल घरेलू उत्पादनातील कृषी व कृषी रोजगाराचा वाटा घटत चालला आहे जो की 1950–51 मध्ये सकल घरेलू उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा 57.7 टक्के होता. तो 2008–09 मध्ये 42 टक्के पर्यंत कमी झाला तर रोजगारातील वाटा 1961 मध्ये 75.9 वरून 2004–05 मध्ये 56.4 टक्के पर्यंत कमी झाला.

प्रस्तूत शोध निबंधात जागतिकीकरण आणि भारतीय शेतकरी याचा आढावा घेत असताना स्पष्ट होते की इतर राष्ट्राच्या तुलनेत पर्जन्यमान, शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण, जमीनीची प्रत व दर्जा, उपलब्ध मनुष्यबळ याबाबतीत आपण अग्रेसर आहोत परंतू विविध पिकांच्या उत्पादनाबाबत अग्रेसर राष्ट्राशी तुलना करता आपण खुपच मागे आहोत म्हणजे भारतीय शेतीची उत्पादकता खुपच कमी आहे. याचा अर्थ आपला सरासरी खर्च खुपच अधिक आहे.

जागतिकीकरणाचा साधा सरळ अर्थ असा आहे की उत्पादन ज्याठिकाणी कमीत कमी खर्चात अधिकाधिक होईल त्याठिकाणी करावे म्हणजे आयात – निर्यातीला बंधने असणार नाहीत. देशी वस्तूना संरक्षण, सबसीडी, अनुदाने, सवलती देता येणार नाहीत. ग्राहक हा बाजाराचा राजा असेल. कमीत कमी किमंतीत वस्तू मिळाली पाहीजे म्हणजे शुध्द स्पर्धा. या स्पर्धेत तोच टिकेल ज्याची क्षमता आहे. भारतीय शेतकऱ्याची क्षमता वाढवायची असेल तर प्रति हेक्टरी व प्रति श्रमिक उत्पादकता वाढविली पाहीजे. परंतू भारतीय शेतीची प्रति हेक्टरी आणि प्रति श्रमिक उत्पादकता इतर राष्ट्राच्या तुलनेत खुपच अल्प असल्याचे दिसून येते. जागतिकीकरण आणि सध्याच्या युगात टिकायचे असेल तर परिस्थितीनुसार बदलता आले पाहिजे, बदल स्विकारला पाहिजे. परंतू शेतीक्षेत्राच्या बाबतीत आपणास बदलता आले नाही. आज भारतीय शेतीक्षेत्राची आणि शेतकऱ्याची काय अवस्था आहे हे सर्वश्रुत आहे. शासकीय आकडेवारी नुसार 1995–2013 या 18 वर्षाच्या काळात देशात 2,84,696 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून देशात दर अर्ध्या तासाला एक शेतकरी आत्महत्या करतो. यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. शेतकरी आत्महत्येची कारणे वरकरणी वेगवेगळी दिसत असली तरी त्यामागचे कारण कर्जबाजारीपणा हेच मुळ आहे. भारतीय शेतकऱ्याच्या मुळ कर्ज बाजारीपणाचे प्रमुख कारण म्हणजे अल्प उत्पादकता. अल्प उत्पादकतेची कारणे आपण सांगत असताना प्रामूख्याने जमीन कसण्याची पध्दती, मान्सूनची अनिश्चितता, शेतीचा आकार, लोकसंख्येच्या अतिभार, मातीतील दोष, सामाजीक वातावरण, उत्पादनाचे तंत्र, भांडवलाचा पुरवठा, कृषी सेवांचा अपूरेपणा, कृषीसंशोधन, माहितीचा अपूरा वापर, शेतमालाची विक्री, इ. चा उल्लेख करतो. परंतू माझ स्पष्ट मत आहे कि सर्व कारणाच्या पाठीमागे एक आणि एकच कारण आहे ते म्हणजे शेतकऱ्याचे अज्ञान आणि निरक्षरता. आज शेती कसण्याची पध्दती आणि वापरावयाचे तत्रंज्ञान, सिचंनाच्या सोयी यानुसार शेतीचे जिराईत, बागाईत, हंगामी, दुर्जल, फळबाग, फुलशेती, पशुधन आणि दुग्धव्यवसाय प्रधान शेती, निशू शेती, मत्स्यशेती, सेंद्रिय शेती, रासायनिक शेती, जैवतत्रंज्ञान शेती, रोपवाटीका शेती, फिरती शेती, वनशेती, हरीतगृहातील शेती असे विविध प्रकार उदयास आले आहेत. सांगायचे तात्पर्य आपली शेती कशा प्रकारची आहे, कोणते तत्रंज्ञान आपल्या उपयोगी पडू शकते, आपल्या शेतीसाठी अनुकुल काय आहे आणि प्रतिकुल काय आहे, बाजारात कोणत्या आणि कशा प्रकारच्या मालाची आवश्यकता आहे. आपल्यासाठी कोणती बाजारपेठ असेल आणि त्या बाजारपेठेतील ग्राहक कोणत्या दर्जाचा असेल किंवा आहे. उत्पादन किती निघेल, भाव काय मिळेल, सरासरी उत्पादन खर्च काय राहील इत्यादी संबधी काहीही अंदाज शेतकऱ्याकडे नसतो ना तर्क. कारण जास्तीत जास्त शेतकरी निरक्षर आणि अज्ञानी आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेचा महाभयंकर आजार म्हणजे भ्रष्टाचार. शेती आणि शेतकऱ्याना सुधारण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे प्रयत्न करत नाहीत असे नाही. केंद्र सरकारकडून सॉईल हेल्थ कार्ड स्किम, निम कोटेड युरीया(NCU), परंपरागत कृषी विकास योजना(PKVY), नॅशनल अॅग्रीकल्चर मार्केट(e-NAM), प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री फसल बिमा योजना(PMFBY), इंटरेष्ट सबवेनशंन स्किम(ISS) तर राज्य सरकारद्वारे ठिबक, मातीसवंर्धन, पशुसंवर्धन, पीक योजना, नर्सरी योजना, पिकसंरक्षण, मत्स्यव्यवसाय विभाग इ. द्वारे मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जातात. परंतू याचा सरकारी बाबू व राजकीय हस्तक्षेप इ. च्या अडचणीमूळे कितपत शेतकऱ्यांना लाभ होतो हा मोठा अभ्यासाचा विषय आहे. यास सुध्दा प्रामुख्याने शेतकऱ्याचे अज्ञान आणि अडाणीपणा हेच कारणीभुत आहेत.

जगतिकीकरणात भारतीय शेती आणि शेतकरी टिकवायचा असेल तर शेती हि उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नव्हे तर शेतीकडे उद्योग व्यवसाय म्हणूनच पाहावे लागेल. उद्योग व्यवसायात मॅनेजिंग डायरेक्टर, मार्केटिंग ऑफीसर, सेल्स मॅनेजर असे उच्चशिक्षीत लोक मोठया पगारावर कार्यरत असतात. परंतू घरच्या शेती मध्ये साधा पदवीधर आपल्या प्राप्त शिक्षणाचा वापर करताना दिसत नाही. एका गावातील 100 शेतकऱ्याची पाहणी केली असता पैकी केवळ 10 शेतकरी पदवी प्राप्त होते. त्यापैकी एक शेतकरी कृषी पदवी प्राप्त होता. 90 शेतकऱ्यापैकी 20 शेतकरी 10 वी पर्यतचे शिक्षण प्राप्त केलेले होते. तर 50 शेतकरी केवळ अक्षरसाक्षर होते.

10 पदवी प्राप्त शेतकऱ्यापैकी एकही शेतकरी 100 टक्के योगदान शेतीसाठी देत नव्हता. येथे एवढेच नमूद करावेसे वाटते की कृषी व्यवसाय आणि कृषी कामाला प्रतिष्ठा राहिलेली नाही. शेती करणे हे सुशिक्षीताच्या दृष्टीने कमीपणाचे झाले आहे. खरे पाहीले तर देशाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेतीच हा असा व्यवसाय आहे की तो सर्वांना रोजगार उपलब्ध करून देईल. निसर्गवाद्याच्या मतानुसार नवनिर्माण करण्याची क्षमता केवळ शेतीतच आहे. शेतीमध्ये छुपी बेकारी आहे हे म्हणतो हे खरे आहे कारण श्रमीक वाढल्याने उत्पादनात वाढ होत नसेल तर. परंतू नवतत्रंज्ञान आणि बुध्दी चातुर्य यांच्या संगमाने कृषी उत्पादनात आणि दर्जात वाढ आणि सुधारणा करण्यास खुप मोठी संधी आहे कारण कृषी उत्पादनात अग्रेसर राष्ट्राच्या तुलनेत बऱ्याच बाबी शेतीसाठी आपणास अनुकुल आहेत. त्यासाठी सुशिक्षीत बेरोजगाराचा ताफा शेतीकडे वळला पाहिजे. त्यासाठी कृषी श्रमाला उत्तम दाम व प्रतिष्ठा प्राप्त होणे जरूरी आहे असे झाले तरच जागतिकीकरण प्रकियेत भारतीय शेती शेतकरी टिकेल अन्यथा यापेक्षा दुरावस्था झालेली आपणास पहावी लागेल.

संदर्भ :–

1. जागतिकीकरण परीणाम आणि पर्याय – गजानन खातू, अक्षर प्रकाशन पुणे
2. जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव – सी. प. खेर, दिलीपराज प्रकाशन पुणे
3. कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र – डॉ. विजय कविमंडनए मंगेश प्रकाशन नागपूर
4. मराठी विश्वकोश
5. भारतीय अर्थव्यवस्था – रमेश सिंह, मॅकग्रा हिल प्रकाशन, नवी दिल्ली

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 5 NO. 1 SPECIAL ISSUE- 1 FEBRUARY 2019

A Peer Reviewed Bimonthly International Journal



**Special Issue On**
**Marathwada Economic Association,**
**36th State Level Conference**

Organised by

**Shri Datta Arts, Commerce & Sci.**
**College Hadgaon Dist. Nanded**
**Date: 04th & 05th Feb. 2019**



Special Issue Editor

**Dr. Dilip Kakde Dr. Kaly**

Mahatma Gandhi Education and Welfare Society's
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES

# Index


| Sr.No | Title of The Research Paper | Name of The Authors | P.No. |
|---|---|---|---|
| 1 | Karl Marx and Value Theory | Mr. Manashakargekar Gangadhar Piraji | 1 |
| 2 | THE STUDY OF KARL MARKS THOUGHT OF THEORY OF VALUE ON CAPITALIST ECONOMY | Prof .ABOLI GANGADHAR JOSHI | 3 |
| 3 | Marxian Ideology | Dr. Pandurang B. Patil | 10 |
| 4 | KARL MARX ECONOMIC THOUGHT | Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar | 14 |
| 5 | कार्लमार्क्स के आर्थिक विकास केअतिरिक्त मूल्य सिध्दात का विश्लेशण | प्रा. डॉ. उशा एन. पाटील | 22 |
| 6 | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार आणि जगातील सदयस्थितीतील आर्थिक विवेचन | डॉ. विकास प्रल्हादराव सावंत | 25 |
| 7 | महान अर्थिक तत्ववेता कार्ल मार्क्स | महाजन जे.पी. | 30 |
| 8 | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार | प्रा. नागनाथ विठ्ठलराव कांबळे प्रा. डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे | 34 |
| 9 | आर्थिक विकासातील कार्ल मार्क्स यांचे योगदान | सौ.पाऊलबुध्दे अनुराधा रामभाऊ प्रा. डॉ. अशोक कोरडे | 37 |
| 10 | कार्ल मार्क्सचे इतिहासाचे भौतिकवादी विश्लेषण | प्रा. डॉ. किशन स. बाभुळगावकर | 40 |
| 11 | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विकासाबाबत विचार | पाटील शितल | 44 |
| 12 | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार | अनिल बालाजीराव चिलपिंपरे | 48 |
| 13 | कार्ल मार्क्सच्या आर्थिक विचारावर प्रभाव पाडणारे घटक | डॉ. कुटे अजय प्रभाकर | 52 |
| 14 | आर्थिक विचारांचे वैभव निर्माण करणारा अर्थषास्त्रज्ञ : कार्ल मार्क्स | आकांक्षा दिपक भोरे | 54 |
| 15 | कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार | डॉ. आनंद शेवाळे प्रा. शबनम सय्यद | 56 |
| 16 | कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार | बुध्देवार सुभाष राजेन्ना | 59 |
| 17 | आर्थिक विषमता आजारावर उपाय कार्ल मार्क्स कि म. गांधी | डॉ. सुभाष रा. यादव | 63 |
| 18 | कार्ल मार्क्स | प्रा. डॉ. मनोजकुमार सोमवंशी गायकवाड जीवन हणमंतराव | 67 |
| 19 | कार्लमार्क्सचे विचार काळाची गरज!. | खोकले आर. के | 70 |


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

## आर्थिक विषमता आजारावर उपाय कार्ल मार्क्स कि म. गांधी

डॉ. सुभाष रा. यादव
विभागप्रमुख (अर्थशास्त्र विभाग)
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड. जि. परभणी

मानवी शरीरात शरीराच्या निकोप वाढीसाठी अन सुदृढ आरोग्यासाठी ज्या प्रमाणे साखरेची भुमिका आहे अगदी त्याचप्रमाणे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या निकोप आणि निरामय आरोग्यासाठी भांडवलशाही हि विथ शुगर आहे तर समाजवाद हा विदावूट शुगर आहे. मानवी शरीरात साखरेचे प्रमाण जास्त झाले तर अनेक शारीरीक व्याधीला सामोरे जावे लागते. तसेच त्याप्रमाणे साखरेचे प्रमाण कमी झाले तर व्यक्ती चक्कर येवून दगावू शकते. म्हणून मानवाच्या सुदृढ आरोग्यासाठी साखर नियंत्रणात असली पाहीजे. अगदी त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेसाठी अनियंत्रीत भांडवलशाही झाली तर देशात मोठया प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण होते. तर समाजवादी अर्थव्यवस्थेत व्यक्ती प्रेरणाशुन्य झाल्याने आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. आज प्रत्येक व्यक्तिला राष्ट्राला विकास हवा आहे. भौतीक सुख, चैन, विलास हवा आहे. त्यासाठी मोठा विकासदर आवश्यक आहे. त्याच प्रमाणे आर्थिक विषमता नको आहे. कारण वर्गसंघर्षाची भिती आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय नैसर्गिक संसाधनावर प्रत्येकाचा समान हक्क आहे. याची जाणीव प्रत्येकाला होण्यासाठी प्रत्येकाला शिक्षणाची आवश्यकता आहे.

आज जगातील प्रमुख आणि बहूतांश अर्थव्यवस्था हया भांडवलशाही अर्थव्यवस्था आहेत. सोवियत रशियाच्या विघटनापासून समाजवाद, साम्यवादाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतीय अर्थव्यवस्था स्वांतत्र्यप्राप्तीपासून मिश्र अर्थवयवस्था म्हणून ओळखली जाते. परंतू १९९१ पासून समाजवादप्रधान मिश्र अर्थव्यवस्था असणारी भारतीय अर्थव्यवस्था आता भांडवलप्रधान मिश्र अर्थव्यवस्था झाली आहे. समाजवादी आणि भांडवलवादी अर्थव्यवस्थाचा विचार करत असताना आर्थिक समता कि आर्थिक विकासदर यापैकी काय श्रेष्ठ आणि काय महत्वाचे याची निवड करत असताना विचारकाना सुध्दा त्रयस्तपणे निवड करणे अशक्य झाले आहे. समाजवादाचे अपयश जगाने पाहीले आहे. तर भांडवलशाहीतील आर्थिक विषमतेचे स्वरूप विदारक भस्मासुरासारखे भयानक दिसत आहे. अगदी त्यामूळेच की काय आज २०० वर्षानंतरही कार्ल मार्क्स विचारंकाच्या मनावर राज्य करताना दिसत आहे. प्रत्येक व्यक्ती राष्ट्राला विकासही हवा आहे आणि विदारक दारीद्रय, बेकारी आणि आर्थिक विषमता नको आहे. करीता प्रस्तूत शोध निबंधात म. गांधी यांची विश्वस्ताची कल्पना आणि कार्ल मार्क्स यांचे वर्गसंघर्षातून समाजवादी साम्यवाद याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

म. गांधी हे अहिंसावादी तर कार्ल मार्क्स हे सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते होते. भिन्न मत वादी असले तरी दोघानांही समता हवी होती. म. गांधी यांनी समाजात समता प्रस्थापीत करण्यासाठी विश्वस्ताची कल्पना मांडली तर मार्क्स यांनी इतिहासाच्या भौतिक मिमांसेच्या माध्यमातून भांडवलशाही विकासात भांडवलदार व कामगार यांच्यात वर्ग संघर्ष होईल व समाजवाद मार्गे साम्यवाद येईल व एकप्रकारे समता प्रस्थापीत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मात्र आज भांडवलशाही व्यवस्था जगात परमोच्च स्थानी पोहचली परंतू जगाने ना म. गांधीजीचा विश्वस्ताच्या भुमिकेचा मार्ग अनुसरला ना श्रमीकाद्वारे सशस्त्र क्रांती झाली. उलट लेनीनवादी साम्यवाद अपयशी ठरून रशियाचे विघटन झाले व जगात मोठया प्रमाणावर आर्थिक विषमतेची दरी अधिकच उंचावली याची कारणे वेगवेगळया राष्ट्रात वेगवेगळीही असतील मात्र जगात आर्थिक विषमतेची दरी मोठया प्रमाणावर वाढत आहे हे सत्य आहे. याची कारणे व मिमांसा पाहण्यापूर्वी

म. गांधी यांची विश्वस्ताची कल्पना व कार्ल मार्क्स यांच्या वर्ग संघर्षातून साम्यवाद यांचा थोडक्यात आढावा घेवू.

**म. गांधी यांची विश्वस्ताची कल्पना :—**

म. गांधी हे अहिंसेचे पुरस्कर्ते होते. अहिंसेच्या मार्गाने क्रांती घडवता येते यावर त्यांचा विश्वास होता. सत्य आणि अहिंसेच्या तत्वाद्वारे जगाला आपल्या देशाची ओळख दिली. गांधीजींनी आर्थिक निती सांगताना विश्वस्त कल्पनेला अधिक महत्व दिले. विश्वस्त कल्पना साकारण्याकरीता अपरीग्रह तत्वाचा अवलंब होणे आवश्यक आहे. अपरीग्रह म्हणजे संग्रह न करण्याची प्रवृत्ती होय. संपत्तीच्या बाबतीत व्यक्तीने अपरीग्रहाचे तत्व स्विकारले तर विश्वस्ताची कल्पना साकार होवू शकते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी अपरीग्रह तत्वाचा स्विकार सर्वांनी करावा असे सांगीतले. श्रीमंतानी समाजातील आर्थिक विषमता कमी होईपर्यंत स्वत:कडे असलेल्या संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समाजाचे विश्वस्त समजावे व समाजाचे विश्वस्त म्हणून स्वत:कडील संपत्ती समाजाच्या उपयोगाकरीता खर्च करावी.

म. गांधी यांची विश्वस्ताची कल्पना या जगात स्वप्न विलासासारखी वाटते. आज प्रत्येक व्यक्तीला सत्तेसाठी संपत्ती आणि संपत्तीसाठी सत्ता हवी आहे. सत्ता आणि संपत्तीच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती व्यक्तीला राष्ट्राराष्ट्रांना एकमेकावर अधिराज्य गाजवण्याच्या वृत्तीमूळे संपत्तीचा कितीही संग्रह झाला तरी संपत्ती अतिरीक्त वाटत नाही. त्यामूळे विश्वस्ताच्या भुमिकेत यायला कोणीही तयार नाही. असे होणार नाही आणि झालेही नाही. विश्वस्ताच्या कल्पनेमागे वर्ग संघर्ष संपुष्टात आणून सामाजीक समता प्रस्थापीत करणे हा गांधीजीचा उदेश होता. परंतू प्रत्यक्षात तसे कुठेही झाले नाही.

कार्ल मार्क्स :—

मार्क्स यांनी इतिहासाची भौतिकवादी मिमांसेद्वारे भांडवलशाहीच्या विकासात विनाशाची बिजे पेरली जातात असे सांगून भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार उत्पादन हे नफयाच्या प्रेरणेतून करतात आणि अधिक नफा मिळवण्याच्या हेतूने श्रमिकांचे शोषण करतात. यातून मध्यमवर्ग नष्ट होवून दोनच वर्ग निर्माण होतील ते म्हणजे शोषक आणि शोषीत. शोषक (भांडवलदार) हे संख्येने कमी आणि शोषीत (श्रमिक) हे संख्येने जास्त असल्यामूळे श्रमिक कामगार व मालक भांडवलदार यांच्यात वर्ग संघर्ष म्हणजे सशस्त्र क्रांती होईल. यात कामगार श्रमिक वर्गाचा विजय होवून भांडवलशाही व्यवस्थेची जागा समाजवादाच्या माध्यमातून साम्यवाद घेईल म्हणजे सर्व संपत्ती समाजाच्या मालकीची होईल सर्वांची होईल यात राजसत्तेला सुध्दा जागा असणार नाही. हे स्पष्ट करण्यासाठी इतिहास कालखंडाचे वर्णन पुरातन समाजवादी, गुलामगिरी, संरजामशाही, भांडवलशाही, समाजवादी, साम्यवाद अशा सामाजिक बदलासाठी या सहा अवस्था सांगीतल्या आहेत.

म. गांधी आणि कार्ल मार्क्स यांच्या विभिन्न विवेचनातून दोघानाही समाजात आर्थिक समता हवी आहे. त्यात म. गांधी यांची आर्थिक समतेसाठी विश्वस्ताची कल्पना हा भाबडा आशावाद वाटतो. तो आधूनिक अर्थशास्त्राला रूचनारा नाही. त्याचमूळे म. गांधीच्या विश्वस्ताच्या कल्पनेतून आर्थिक समतेची फारशी अपेक्षाही बाळगली गेली नाही. परंतू कार्ल मार्क्सचे इतिहासाची भौतिकवादी मिमांसा हे विश्लेषण वस्तूनिष्ठ आणि व्यावहारीक पातळीवर आधारीत असल्याने आजही वर्गसंघर्षातून साम्यवादी व्यवस्था येईल किंवा येवू शकते असे वाटते. परंतू प्रत्यक्षात असे झाले नाही याची अनेक कारणे आहेत. प्रामूख्याने जातीभेद, वंशभेद, वर्णभेद, लिगंभेद ईत्यादीमूळे समाजव्यवस्थेत गुंतागुत निर्माण झालेली आहे. त्याच बरोबर नविन नविन शोध, कल्याणकारी योजना, कामगार कायदे ईत्यादीमूळे मार्क्सचा साम्यवाद प्रत्यक्षात येण्यास गतीरोध निर्माण होत आहे.

आज जगातील बहुसंख्य राष्ट्रे हि लोकशाही प्रधान व भांडवलवादास प्रोत्साहन देणारे आहेत. समाजवाद साम्यवादाचा पराभव

होताना दिसत आहे. यावर विचारमंथन करून भांडवलवाद, समाजवाद, साम्यवादाच्या गुण दोषाचा विचारांती भांडवलशाही व समाजवादी व्यवस्थामधील दोष टाळून अशी मिश्र व्यवस्था स्विकारावी कि जेणे करून विकासाचा वेग सर्वोच्च स्थानी राहिल व समाजात आर्थिक समानता प्रस्थापीत होईल. भारताने स्वांतत्र्य प्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आहे. परंतू देशात आर्थिक समानता तर प्रस्थापीत झालीच नाही उलट काही बडया उदयोग समूहाकडे संपत्तीचे मोठया प्रमाणावर केंद्रीकरण झाले याच्या कारण मिमांसेकडे पाहीले तर निदर्शनास येते की ज्यांच्याकडे भांडवल त्यांना कायदा, न्याय, गृह, शिक्षण, आरोग्य यांच्याकडून मदत होते. कल्याणकारी लोकशाही प्रधान राज्य असे केवळ उच्चारतो. परंतू प्रत्यक्षात समाजातील अंधश्रध्दा, दारीद्रय, निरक्षरता याचा लाभ उठवून सत्ता कशी हस्तांतरीत करावयाची हे भांडवलदाराना चांगले अवगत असल्याने लोकशाहीच्या माध्यमातून भांडवलदार सत्ता हस्तगत करतात किंवा राजसत्ता आणि भांडवलदार यांच्यांत एक प्रकारे साटे लोटे चालत आले आहे याचा इतिहास साक्षीदार आहे. त्यामूळे लोककल्याणकारी राज्यात घेतले गेलेले जन कल्याणाचे निर्णय भांडवलदाराना जास्त अनूकूल ठरले. त्याचबरोबर कल्याणकारी योजनामधील मोठया प्रमाणावरील भ्रष्टाचार यामूळे खऱ्या लाभार्थ्यांना लाभ झालाच नाही. समाजात जातीभेद, धर्मभेद, लिंगभेदाचे विष पेरून, त्यांना त्यात गुंतवून आपल्या हक्काची जाणीव होवू न देणे अशा प्रकारे बुध्दीजीवी लोक बुध्दी भेद करून समाजास एक न होवू देता समाजातंर्गत कलह लावून देतात व लोक काय महत्वाचे हे विसरून आपसात भांडत राहतात.

एकंदरीत विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की आज प्रत्येक व्यक्ती, राष्ट्राला वेगाने विकास हवा आहे. आणि तो शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणाची नासाडी करणारा असता कामा नये. हे भांडवलप्रधान मिश्र लोकशाहीप्रधान अर्थव्यवस्थेत शक्य आहे. मात्र त्यासाठी समाजात, अंधश्रध्दा आणि निरक्षरता असता कामा नये तर समाज हा शिक्षीत आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारा असायला पाहीजे. संपूर्ण जगाचा इतिहास पाहिल्यानंतर असे लक्षात येते की राष्ट्र असो वा समाज वा कुटूंब यात ज्याच्याकडे बुध्दी त्यांच्याकडे सत्ता. याचा अर्थ सत्तेच्या माध्यमातून सातत्याने बुध्दीजीवी वर्गाने श्रमजीवी वर्गावर या ना त्या कारणाने अन्याय केलेला दिसून येतो. परीणाम स्वरूप आर्थिक विषमतेची दरी रूदांवत जाते. यावरून असे स्पष्ट होते की म. गांधी यांची विश्वस्ताची कल्पना प्रत्यक्षात येणार नाही ना कार्ल मार्क्सचा वर्गसंघर्ष. तर लोकांचे लोकासाठीचे राज्य समाजात आर्थिक समता प्रस्थापीत करणारे राज्य निर्माण करावयाचे असेल तर अनेक कल्याणकारी योजना राबविण्याऐवजी साम्यवादी समाज व्यवस्थेसाठी भारतासारख्या देशाने कार्यकारी लोकसंख्येच्या क्षमतेच्या महत्तम उपयोगी गुणवततेनुसार मोफत अनिवार्य प्राथमिक शिक्षण तर नियोजनात्मक मोफत उच्च व तांत्रिक शिक्षण दिले पाहिजे. त्याच बरोबर सर्वांना मोफत आरोग्य विषयक सुविधा दिल्या पाहिजेत.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की आधूनिक युगात गांधी शक्य नाहीत तर मार्क्स प्रत्यक्षात येवू नये या करीता वेगाने आर्थिक विकासासह सर्वांगीण विकास (सर्वांचा विकास) शाश्वत आर्थिक विकास यासाठी राजसत्तेसह भांडवलदार बुध्दीजीवी वर्गाने पुढाकार घ्यावा व सर्वांना मोफत शिक्षण व आरोग्य कसे मिळेल यासाठी प्रयतन करावेत.

संदर्भ :—

१. https://www.bbc.com<hindi>international

२. Mr.vikaspedia.in>childrens.corner

३. www.choprak.com<karl-mark>article

४. चपराक मासीक नोव्हेंबर २०१७ अंक

५. https://www.bbc.com<marathi>international

IMPACT FACTOR SJIF 2019-6.380

ISSN 2319-4766

SRJIS

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Special Issue of

An International, Peer Reviewed & Referred

## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN-MAR,2020,V-8/45

**Editor-In-Chief**

Prin. Dr. G. N. Shinde

**Editor**

Dr. P. R. Muthe

**Co-Editors**

Dr. D. D. Bhosale

Dr. D. A. Pupalwad



ISSN 2319-4766

On The Occasion of Centenary Birth Anniversary Year of
Hon. Dr. Shankarraoji Chavan
&
Silver Jubilee Years of Globalization of Indian Economy
A One Day National Level Conference
On

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Date: 8th February 2020

## Organized by

P. G. & Research Department of Economics
**Yeshwant Mahavidyalaya, Nanded**
(NAAC Reaccredited at 'A' Level (III Cycle) with 3.29 CGPA)
(College with Potential for Excellence – CPE)

In Collaboration with
**S. R. T. M. University, Nanded**

**Special Issue of**
An International, Peer Reviewed & Referred
**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**
JAN-MAR, 2020, V-8/45

**Editor In Chief**
Principal Dr. G. N. Shinde

**Editor**
Dr. P. R. Muthe

**Co-editor's**
Dr. D. D. Bhosale
Dr. D. A. Pupalwad

SJIF 2019 = 6.380
**ONLINE ISSN 2278-8808** **PRINTED ISSN 2319-4766**

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

# Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**JAN-MAR, 2020, VOL-8, ISSUE-45**


| | | |
|---|---|---|
| 1 | जागतिकीकरणानंतर मराठवाड्यातील स्टेट बँक ऑफ इंडियाची प्रगती<br>*डॉ. अनिल बनकर* | 1-9 |
| 2 | भारतातील आर्थिक सुधारणा : कारणे व परीणाम<br>*डॉ. सोनाजी एस. पतंगे व प्रा. सुनिल गणेशराव पाटील* | 10-15 |
| 3 | जागतिकीकरणातील भारतीय दारिद्र्याचा तुलनात्मक अभ्यास<br>*अंजली शिवाजी खरपुडे व प्रा. डॉ. माधव मुरहारी गायकवाड* | 16-21 |
| 4 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषिवरील परिणाम<br>*प्रा. डॉ. मुंडकर एस.एम.* | 22-26 |
| 5 | कृषीव्यवसायात जगतिकीकरणाचे परिणाम<br>*डॉ. सुरेश टी.सामाले* | 27-30 |
| 6 | जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक<br>*प्रा.डॉ.शेळके मदन लक्ष्मण* | 31-35 |
| 7 | जगतिकीकरण : भारताच्या औद्योगिक विकासाचा प्रश्न आणि उपाययोजना<br>*डॉ. ए. एस. नलवडे* | 36-39 |
| 8 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील बँकींग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा<br>*डॉ. यादव सुभाष रामराव* | 40-45 |
| 9 | जागतिकीकरण आणि शेतकरी आत्महत्या<br>*प्रा.एन.व्ही.कांबळे* | 46-50 |
| 10 | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम<br>*प्रा.डॉ.एल.एच.पाटील व प्रा.सुकुमार दत्ता पाटील* | 51-56 |
| 11 | भारतातील कृषी उत्पादन खर्च आणि कृषी उत्पादकतेवरिल जागतिकीकरणाचे परिणाम<br>प्रा. डॉ. मगर डी.के. | 57-62 |
| 12 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>*प्रा. डॉ. एल. एच. पटील व प्रा. नेलवाडे महेश शिवाजीराव* | 63-66 |


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Arts College
Gangakhed Dist.Parbhani

# जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील बॅकींग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

**डॉ. यादव सुभाष रामराव**

*विभागप्रमुख (अर्थशास्त्र विभाग), कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,*

*गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी*

*tanmaysyadav2017@gmail.com*

**प्रस्तावना :—**

१९९० च्या दशकाच्या सुरूवातीला भारतीय अर्थव्यवस्थेची कुंटीतावस्था आणि विदेशी गंगाजळीची चिंताजनक स्थिती यावर उपाय म्हणून तेव्हाच्या भारत सरकारने नविन आर्थिक सुधारणा कार्यक्रमातंर्गत भारतीय अर्थव्यवस्थेची दिशा बदलण्यास सुरूवात केली. नविन आर्थिक सुधारणा कार्यक्रमातंर्गत आर्थिक क्षेत्रात अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले गेले यालाच थोडक्यात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण म्हटंले जाते.

खाजगीकरण उदारीकरण जागतिकीकरण या आर्थिक सुधारणा कार्यक्रमातंर्गत बॅकींग व वित्तीय क्षेत्रातही फार मोठया प्रमाणात बदल करण्यात आले, बदल घडून आले. त्याचा बॅकींग व वित्तीय क्षेत्रावर परिणाम कशा प्रकारे झाला याचा थोडक्यात आढावा प्रस्तूत शोध निबंधातून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१९९१ च्या नविन आर्थिक धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेची दिशा बदलली. स्वांतत्र्य प्राप्तीनंतर भारताने स्विकारलेले नियोजणात्मक विकासाचे काहिसे समाजवादाकडे झुकलेले धोरण बदलून मिश्र अर्थव्यवस्थेचे परंतू भांडवलशाहीचा उदो उदो करणारे धोरण स्विकारले. या अंतर्गत सरकारचा सार्वजनिक उद्योगातून काढता पाय, विदेशी गुंतवणुकीस सरळ परवानगी, खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन, सार्वजनिक उद्योगासाठी राखीव उद्योग असणारे खाजगी गुंतवणुकीसाठी खुले करणे याच बरोबर आयात—निर्यातीवरील निर्बंध कमी करणे, सामाजिक कल्याणासाठी दिली जाणारी अनुदाने व सवलती कमी करणे इत्यादीला प्रारंभ झाला. यातून मग भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढ स्वास्थ्यासाठी आवश्यक असलेले बॅकींग व वित्तीय क्षेत्रही सुटले नाही.

प्रस्तुत शोध निबंधात १९९१ नंतर बॅकींग व वित्तीय क्षेत्रात त्यातही प्रामुख्याने बॅकीग पध्दतीत काय बदल झाले व त्याचा प्रामुख्याने भारतीय अर्थव्यवस्थेत काय परिणाम दिसून येतो याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे :—**

१. बॅकीग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा कार्यक्रमातंर्गत नेमलेल्या नरसिंहम समिती I व II च्या शिफारशींचा थोडक्यात आढावा घेणे.

२. प्राधान्य क्रम क्षेत्रक कर्जाबाबत नरसिंहम समिती शिफारस व धोरणाचा विशेष आढावा घेणे.

**संशोधन विषयाची गृहितके :—**

१. नरसिहंम समितीच्या सर्व शिफारशी केवळ बॅकीग व वित्तीय क्षेत्राला मजबुती व बळकटी देणाऱ्या असून बॅकीग व वित्तीय क्षेत्राचीच काळजी घेणाऱ्या आहेत.

२. नरसिंहम समितीच्या शिफारशी सामाजिक कल्याण, आर्थिक स्थैर्य, आर्थिक समानता

यापासून सरकार, RBI, व व्यापारी बॅंका यांना दुर नेणाऱ्या आहेत.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता प्रामुख्याने दुय्यम स्वरूपाच्या साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात दैनिक वर्तमानपत्रातील लेख, संशोधन जर्नल्स, मासिके, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट इत्यादीचा समावेश आहे. वरिल उद्दिष्टे समोर ठेवून सामुग्री संकलीत करून विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून शोध निबंधातील विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन विषय अभ्यासाचे महत्व :—**

आजच्या स्थितीत कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासात बॅंकीग व वित्तीय क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यातल्या त्यात भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर बॅंकीग व वित्तीय क्षेत्राने आर्थिक विकासात महत्वपुर्ण भुमिका पार पाडली आहे. भविष्यकाळातही आर्थिक विकासात बॅंकीग व वित्तीय क्षेत्राची भुमिका महत्वपुर्ण असणार आहे. देशाच्या बॅंकीग व वित्तीय क्षेत्रात सुधारणेच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार अनेक समित्या गठीत केल्या परंतु १९९१ नंतर देशात मोठया प्रमाणावर आर्थिक क्षेत्रात घडून आलेल्या बदलाच्या अनुषंगाने नेमलेली नरसिंहम समितीची भुमिका अतिशय महत्वपुर्ण ठरली आहे.

**भारतातील बॅंकीग आणि वित्तीय क्षेत्रातील सुधारणा पार्श्वभूमी :—**

देशात बॅंकीग व वित्तीय व्यवसायाला बॅंक ऑफ हिंदुस्तान या बॅंकेच्या स्थापनेने १७७० पासून सुरूवात झाली. १८०६ बॅंक ऑफ बेंगाल (कोलकत्ता), १८४० बॅंक ऑफ बॉम्बे व १८४३ बॅंक ऑफ मद्रास या तिन प्रेंसिडेन्सी बॅंकाचे १९२१ मध्ये इंपेरिअल बॅंक ऑफ इंडिया व पुढे १९५५ मध्ये इंपेरिअल बॅंक इंडियाचे स्टेट बॅंक ऑफ इंडियात रूपांतर व १९६९ ला १४ मोठया बॅंकाचे व १९८० ला पुन्हा ०६ मोठया बॅंकाचे राष्ट्रीयीकरण हा १९९० पुर्वीच्या भारतातील राष्ट्रीयकृत बॅंकाचा इतिहास एका बाजुला तर हिटलर यंग कमिशनच्या शिफारशीनुसार १९३४ च्या बॅंकीग अॅक्ट नुसार खाजगीत १९३५ मध्ये अस्तित्वात आलेली रिझर्व बॅंक ऑफ इंडिया व पुढे रिझर्व बॅंक ऑफ इंडियाचे बॅंकिग अॅक्ट १९४९ नुसार करण्यात आलेले राष्ट्रीयीकरण म्हणजे भारताची केंद्रीय बॅंक म्हणून रिझर्व बॅंक ऑफ इंडिया ओळख एवढया ठळक शब्दात सांगता येते.

देशात बॅंकीग आणि वित्तीय क्षेत्रातील सुधारणाकरीता निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी वेळोवेळी ए. के. भुचर समिती पासून ते विपिन मलीक समिती र्प्यंत अशा एकूण ५० पेक्षा अधिकच्या संख्येने समित्या गठीत करण्यात आल्या. परंतू सर्वाधिक चर्चेत राहिली ती म्हणजे नरसिहंम समिती एक व दोन.

**एम नरसिहंम समिती एक :—**

देशात आर्थिक सुधारणा कार्यक्रमाला प्रारंभ झाला होता. अर्थव्यवस्थेने खाऊजा धोरण स्विकारले होते. अर्थव्यवस्थेतील बदलानुरूप व बदलत्या काळानुरूप बॅंकीग व वित्तीय क्षेत्र अधिक प्रभवी, स्पर्धात्मक व कार्यक्षमक करण्याच्या दृष्टीने पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या काळात तेव्हाचे अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी वित्तीय सुधारणाच्या दृष्टीने १४ ऑगस्ट १९९१ रोजी एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली एम नरसिंहम समिती एक गठीत केली. समितीने आपला अहवाल सरकारला नोव्हेंबर १९९१ मध्ये सादर केला तर डिसेंबर १९९१ मध्ये अहवाल चर्चेसाठी संसदेत सादर झाला.

**नरसिंहम समिती एक प्रमूख शिफारशी :—**

**१. व्याजदर निर्धारण बाजार शक्ती द्वारा :—**

व्यापारी बँक देत असलेल्या कर्जाचा व्याज दर केंद्र सरकार व RBI ठरवत असे परंतू हा व्याज दर ठरवण्याचे स्वांतत्र्य व्यापारी बँकाना द्यावे जेणे करून व्याज दर निर्धारण मागणी पुरवठयानुसार म्हणजे बाजार शक्ती द्वारे होईल.

**२. आरक्षित निधी प्रमाणा बाबत :—**

नरसिहंम समितीच्या असे निदर्शनास आले की बँकाची ४०% पेक्षा अधिक राशी कायदेशिर निधीचे प्रमाण (SLR) व रोख राखिव निधीचे (CRR) प्रमाण या पडून राहते त्याचा फटका बँकाना बसतो. याचा विचार करून CRR व SLR मध्ये कपातीची सुचना केली जेणे करून बँक व्यवसायासाठी अधिक निधी उपलब्ध होईल.

**३. कर्जवसूली न्यायालयाबाबत :—**

बँकानी दिलेली कर्ज वेळेत वसूल न झाल्यामूळे बँका बुडण्याची भिती असते. त्यामूळे कर्जवसुली बाबत स्वतंत्र न्यायाधिकरण असावे यासाठी समितीने कर्जवसुली न्यायाधिकरण स्थापन करण्याची शिफारश केली. त्यानुसार १९९३ मध्ये कर्जवसुली न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

**४. प्राधान्यक्रम क्षेत्र कर्जा बाबत :—**

सामाजिक न्याय व सामाजिक कल्याण हेतूने अर्थवयवस्थेमध्ये असणारे मागास क्षेत्र जसे की कृषी, सिमांत, लघू व कुटीर उद्योग, शिक्षण इत्यादी कमजोर घटकांना बँकानी प्राधान्य क्रमाने कर्ज देताना कर्जाचे प्रमाण व कर्जावरील व्याजदर सरकार ठरवत असे आणि तो अत्यल्प असे परंतु समितीने शिफारस करताना प्राधान्यक्रम क्षेत्रक कर्जव्याजदर सामान्य असावा किंवा व्याजदराबाबत बँकाना अधिकार द्यावा. तसेच प्राधान्यक्रम क्षेत्र कर्जाचे प्रमाण ४०% वरून १०% पर्यंत कमी करावे.

**५. सार्वजनिक बँकामधील सरकारच्या हिस्सेदारी बाबत :—**

समितीने सुयवातीलाच खाजगी बँकाचे राष्ट्रीयीकरण होणार नाही हे स्पष्ट केले होते. या बरोबर सरकारने सार्वजनिक बँकातील आपला वाटा ५१% पर्यंत कमी करून ४९% पर्यंत खाजगी भांडवलाला प्रवेश द्यावा जेणे करून खाजगी भांडवलदारामुळे सरकारी बँका व्यावसायीक बनतील.

**६. खाजगी व विदेशी बँकाना बँकीग सेवेची परवानगी बाबत :—**

देशात बँकीग व वित्तीय क्षेत्रात स्पर्धात्मकता वाढीस लागावी यासाठी खाजगी व विदेशी बँकाना बँक व्यवसायात परवाना द्यावा. त्यानुसार देशात बँकीग क्षेत्रात १९९३ मध्ये नविन १० बँकाचा प्रवेश झाल्याचे दिसून येते.

**७. बँकीग लोकपाल (Banking Ombudsman) स्थापना :—**

ग्राहक व बँक कर्मचाऱ्याच्या समस्या व तकारीच्या निवारणाकरीता बँकीग लोपाल स्थापन करावे जेणे करून तकारीचे तात्काळ निवारण होईल.

नरसिंहम समितीच्या वरील शिफारशी अभ्यासल्यानंतर असे निदर्शनास येते की समितीने खाऊजा धोरणाला पुरक असाच विचार करून बँकीग व वित्तीय क्षेत्र मजबुत स्पर्धात्मक व कार्यक्षम कसे होईल

याच बाजूने प्रामूख्याने विचार करून सामाजिक कल्याण व मागास लहान कमकुवत घटकाच्या विकासातील बॅकेच्या भुमिकेकडे पुर्णत: दुर्लक्षात केले असून भांडवलाच्या सुरक्षिततेचा आणि लाभ क्षमतेचाच विचार अधिक केला आहे.

**नरसिंहम समिती कंमाक दोन :—**

एम. नरसिहंम यांच्या अध्यक्षतेखाली १९९७ मध्ये प्रामूख्याने बॅकीग क्षेत्रातील सुधारणाच्या संदर्भात स्थापन झालेल्या समितीने आपला अहवाल १९९८ साली सादर केला. हि समिती नरसिंहम समिती दोन या नावाने ओळखली जाते.

**नरसिंहम समिती कमांक दोनच्या प्रमूख शिफारशी :—**

**१. बॅकाच्या स्वायत्तेबाबत (Autonomy Banks):—**

एम. नरसिंहम समितीचे असे मत होते बॅकाना कर्मचारी भरती प्रकिया—प्रशिक्षण—श्रमिकासंबधी धोरण आखण्या संदर्भात पुर्ण स्वायत्तता असावी जेणे करून व्यावसायीक बॅकीग पध्दतीतील सर्वोत्कृष्ट पध्दती प्रथांना अनुरूप असावी. सार्वजनिक बॅकाच्या संचालक मंडळात नेहमी सरकारचे प्रतिनिधी म्हणून राजकिय नेते, नौकरशहा, संसद सदस्य यांची वर्णी लागत असल्याने बॅकाच्या दैनंदिन कामकाजात सरकारचा हस्तक्षेप वाढत चालला आहे. त्यामूळे संचालक मंडळाच्या कार्याचे समिक्षण होणे जरूरी असल्याचे म्हटले आहे. यामूळे सार्वजनिक बॅकाच्या स्पर्धात्मकतेचा टिकाव लागू शकेल.

**२. स्वेच्छा सेवा निवृत्ती योजना संबधी :—**

सार्वजनिक बॅकाना आवश्यकतेनुसार कर्मचारी संख्येमध्ये बदल करता यावा किंवा वेतनावरील खर्च कमी करता यावा यासाठी किंवा कर्मचारी कमी करण्यासाठी बॅकानी स्वेच्छा सेवा निवृत्ती (VRS) चा अवलंब करावा.

**३. बॅकाच्या विलीनीकरणासंबधी :—**

आर्थिक स्थिती डबघाईस आलेल्या किंवा दिवाळखोर बॅकाचे विलीनीकरण मोठया किंवा चांगल्या आर्थिक स्थितीतील बॅकामध्ये करू नये. दोन चांगल्या स्थितीतील बॅकाचे किंवा मजबुत आर्थिक स्थितीतील बॅकाचे विलीनीकरण करावे.

**४. बॅकीग सरंचनेसंबधी :—**

नरसिहंम समिती दोनने बॅकीग सरंचनेसंबधी चार स्तरीय बॅक सरंचनेची एक चांगली शिफारस केलेली आहे. आंतरराष्ट्रीय स्तराच्या देशात किमान दोन ते तीन बॅका असाव्यात. तसेच राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या देशात मोठया आठ ते दहा बॅका असाव्यात याच प्रमाणे विभागीय स्तरावर क्षेत्रीय बॅका व खालच्या स्तरावर स्थानिक बॅका याप्रमाणे रचना चार स्तरीय असावी हे स्पष्ट केले.

**५. रिझर्व बॅकेच्या भुमिकेत सुधारणेसंबधी :—**

भारतीय बॅक व्यवसायात रिझर्व बॅक एकाच वेळी बॅकाची नियामक आणि बॅकाची बॅक म्हणजे मालक या भुमिकेत असते. परंतू नरसिहंम समितीने स्पष्ट केले की या भुमिकेचे विभाजन व्हावे व रिझर्व बॅकेने बॅकाची मालक या भुमिकेपेक्षा बॅकाची नियामक म्हणून भुमिका चोख पार पापडावी.

**बिगर परतावा संपत्ती (Non Performing Asset) संबधी :—**

भारतीय बॅकाच्या खास करून सरकारी बॅकाच्या प्रगतीतील प्रमुख अडसर हा NPA चा आहे. यासंबधी समितीने महत्वपूर्ण शिफारस केली आहे. नरसिंहम समितीने NPA बाबत ARC (Asset Reconstruction Company) संपत्ती पुर्नमुल्यांकन कपंनी स्थापन करण्याची शिफारस केली आहे. बॅका NPA ची विक्री ARC ला करतील. ARC तारण संपत्तीची विक्री करून पैसे वसून करेल. याबरोबरच NPA ची निवड करून वर्गीकरण करण्याकारीता योग्य व्यवस्थेची निर्मीती करण्याची पिफारस केली आहे.

**६. कर्ज वसुलीकरीता कायदेशिर व्यवस्थेची आवश्यकता :—**

बॅकानी दिलेल्या कर्जाची वसुली करण्याकरीता कायदेशिर व्यवस्था असावी या अनुषंगाने देशात २००२ साली SARFAESI-Act ची निर्मीती केली आहे. या कायद्यान्वये ARC ला तारण गृह व इतर संपत्ती विक्री करण्याची शक्ती प्राप्त झाली आहे.

**७. बॅक संगणकीकरण, डिजिटलीकरण, ऑनलाइन पेमेंट संबधी कायदेशिर फ्रेमवर्कची आवश्यकता**

यानुसार Payment and Settlement Act 2007 अस्तित्वात आला आहे.

**८. बॅकीग व्यवसायाअंतर्गत स्पर्धात्मकता**

वाढीस लागण्याकरीता पुन्हा खाजगी व विदेशी बॅकाना बॅक व्यवसायासाठी परवानगी देऊन खाजगी व विदेशी बॅकाची संख्या वाढविण्याची शिफारस केली आहे.

**निष्कर्ष :—**

१. नरसिंहम समिती I व II दोन्हीच्या शिफारसीवरून स्पष्ट होते की सर्व शिफारशी बॅकीग व वित्तीय क्षेत्राला जागतीक पातळीवरील स्पर्धात्मकतेच्या दृष्टीने मजबुती देणाच्या दृष्टीने आहेत.
२. कर्जाचा व्याजदर, कर्जाचा प्राधान्य क्षेत्रकम, संचालक मंडळावरील संचालक नियुक्त्या, कर्मचारी भरती इत्यादी संबधी शिफारशी सरकारी व राजकिय हस्तक्षेप कमी करणाऱ्या आहेत.
३. संगणकीकरण, डिजीटलीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या आहेत.
४. सामाजिक कल्याण दृष्टीकोनाकडे पुर्णत: दुर्लक्ष केले आहे.
५. वित्तीय साक्षरता व वित्तीय समावेशनाबाबत काहीही विचार केलेली नाही.
६. कर्मचारी व ग्राहकाबाबत विचार नसून केवळ बॅक व्यवसाय व बॅक इत्यादीमधील गुणात्मक व संख्यात्मक वाढ व अंतर्गत स्पर्धा यावर भर दिला आहे.

**शिफारशी :—**

१. प्राधान्यक्रम क्षेत्र कर्ज व व्याजदरा बाबतचा वाटा सरकारने उचलावा व सार्वजनिक, खाजगी व विदेशी बॅकाची नुकसान भरपाई शासनाने प्रत्यक्ष करावी.
२. वित्तीय साक्षरता व वित्तीय समावेशना करीता स्वतंत्र यंत्रणेमार्फत शासनाने प्रयत्न करावेत.

**सारांश :—**

भारतीय बॅक व वित्तीय क्षेत्रातील सुधारणाबाबत नरसिंहम समितीने एक व दोनच्या माध्यमातून केलेल्या शिफारशी संपूर्ण भारतीय बॅकीग व वित्तीय क्षेत्राला मजबुती देवून जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेसाठी तयार करणाऱ्या आहेत. यातून गुंतवणुकदाराच्या गुंतवणुकीला सुरक्षिततेला मजबुती मिळत असून कर्जबुडवेगिरीला चाप बसेल व बॅक बुडण्याचे प्रकार कमी होवून बॅकाची बाजार जोखीम कमी होत आहे.

परंतू भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकास साधायचा असेल तर बॅकीग व वित्तीय क्षेत्राची भुमिका महत्वाची ठरते. परंतु समितीने याकडे पुर्णतः दुर्लक्ष केले आहे. याकरिता सरकारला स्वतंत्र यंत्रणमार्फत पुढाकार घेणे अगत्याचे ठरेल.

**संदर्भ :—**


1. *The Indian Economy by Sanjeev Verma.*
2. *En.wikipeadia.org/wiki/narsimham-committee-bank-sector-reform*
3. *Civilserviceindia.com/subject/management notes /recent-reforms in financial-sector.html*
4. *https://www.ibbi.gov.in*
5. *https://www.rbi.org.in*

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue - 126

# Teaching, Research & Extension in Philosophy : Problems & Prospects



**Guest Editor :**
Dr. Sudhir D. Ingale
I/C Principal
Mudhoji College, Phaltan,
Dist. Satara (MS) India.

**Executive Editors of the Issue :**
Dr. Navnath Raskar
Dr. Sunildatt Gavare

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

Principal
Late. Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist Parbhani

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 68 | ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात संशोधनाचे महत्त्व | प्रा. आनंद पवार | 264 |
| 69 | शालेय स्तरावरील खेळाडू आणि विगर खेळाडू विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास | श्री संदीप खिलारे | 267 |
| 70 | मनोसामाजिक समस्या व विकासाच्या अवस्था | प्रा. व्ही. बी. अडसरे | 271 |
| 71 | जुन्नर तालुक्यातील नोकरदार व व्यावसायिक व्यक्तींच्या विविध मूल्यांचा तुलनात्मक अभ्यास | प्रा. जावेद शेख | 274 |
| 72 | महाराष्ट्राच्या ग्रामीण नेतृत्त्वाचा अभ्यास | मदन जहांगीर पाडवी | 279 |
| 73 | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | डॉ. साहेबराव सातपुते | 283 |


*इस अंक के सभी अधिकार प्रकाशकने आरक्षित किए है। प्रकाशित आलेख पुन:प्रकाशित करने से प्रकाशक एवं लेखक की संयुक्त लिखित अनुमती जरुरी है । प्रकाशित आलेखो में व्यक्त मंतव्य केवल लेखक के मंतव्य से संपादक और प्रकाशक सहमत हो, यह जरुरी नहीं है । आलेख के संदर्भ में उपस्थित कॉपी* ***(Originality of the papers)*** *की जिम्मेवारी स्वयं लेखक की है ।*

Principal
Late. Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261 | February-2019
Special Issue 126 : Teaching, Research & Extension in Philosophy : Problems & Prospects
UGC Approved Journal

# संशोधन विषयाची निवड व महत्व

डॉ. सातपुते साहेबराव बाबूराव
तत्त्वज्ञान विभागप्रमुख
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड, जि. परभणी

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनात त्याला खुप महत्व आहे. वर्तमान ज्ञानात नविन ज्ञानाची भर टाकणे हे संशोधनाचे मुलभूत कार्य आहे. सतत होणारे संशोधन व त्यावर आधारीत निष्कर्ष यामुळे आज आपला समाज या उन्नत अवस्थेपर्यंत पाहोचला आहे. संशोध नही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पध्दत आहे. संशोधनामुळेच सर्व शास्त्रांचा विस्तार व विकास होत आहे.

मानव हा वुध्दीजीवी प्राणी आहे व घडणाऱ्या प्रत्येक घटनाची कारणमिंमासा जाणून घेण्याची त्याची जिज्ञासा असते. त्याची हीच जिज्ञासा सामाजिक संशोधनाचा आधार आहे.

सामाजिक संशोधन ही संज्ञा "समाज व संशोध्धन या दोन गोष्टीशी निगडीत आहे म्हणून आपल्याला असे म्हणता येते की, सामाजिक घटना, व्यवहार, तथ्ये, सिध्दांत व नविन ज्ञान यांच्याशी संबधीत असलेल्या सर्व प्रकारच्या संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात"

**सामाजिक संशोधनाच्या व्याख्या :–**

सामाजिक घटना, समस्या व व्यवहार इ. मधील अचुक कार्यकारण संबध शोधून काढण्यासाठी व संबधीत विषयाचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी केलेल्या पध्दतशिर अध्ययनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात असे मत डॉ. बोधनकर व प्रा. अलोणी यांनी मांडले आहे.

**सामाजिक संशोधनाचा उद्देश :–**

सामाजिक संशोधनाचा सबंध हा सामाजिक घटना समस्या व व्यवहार यांच्याशी असतो. सामाजिक संशोधनामुळेच नविन तथ्ये शोधून काढली जातात. जुन्या तथ्याचे पुन्हा परीक्षण केले जाते. सामाजिक संशोधनामध्ये विविध सामाजिक घटकामध्ये असणारा अचुक कार्यकारणसंबध शोधून काढण्याचा सातत्याने प्रयत्न होत असतो. सामाजिक संशोधन हे पध्दतशिर अध्ययन आहे. यामूळे संबधीत विषयाचे ज्ञान अद्ययावत होते. सामाजिक संशोधनाचे काही प्रमुख उद्देश सांगीतलेले आहेत.

1. ज्ञानाचा विकास करणे.
2. सामाजिक घटनांचा व जीवनांचा शास्त्रीय अभ्यास करणे.
3. मानवतेचे कल्याण करणे.
4. सामाजिक समस्याचे उत्तर शोधणे.
5. कार्यकारण संबधाचा शोध घेणे.
6. सामाजिक नियंत्रण ठेवणे व अनुमान काढणे.

**संशोधन विषयाची निवड :–**

संशोधनातील समस्येची किंवा विषयाची निवड झाल्याबारोबर विद्यार्थ्याच्या अभ्यासाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. अन्यथा विद्यार्थी दिशाहिन वाचन, मनन, विचार करीत असतो. म्हणूनच संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सर्वात अगोदर कोणत्या विषयावर संशोधन करावयाचे तो विषय निश्चित करून घ्यावा.

Impact Factor 5.707

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VI ISSUE-II Feb. 2019

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's C
Gangakhed Dist.Parbhani

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 28 | प्रा.उमेश मोहन पाटोळे | बागलाण तालुक्यातील केळझर व हरणबारी जलप्रकल्पांची शेती विकासातील भुमिका | 92 To 95 |
| 29 | डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे | वृत्तपत्र माध्यमातील मराठी भाषेचे महत्व | 96 To 99 |
| 30 | प्रा.डॉ.आनंद वारके | 'तळ ढवळताना'काव्यसंग्रहातील जागतिकीकरणाचा शोध | 100 To 103 |
| 31 | डॉ. अंकुश ना. बारमाटे | नागपूर जिल्ह्यातील भूमी उपयोजन व पिकांचा क्षेत्रीय अभ्यास | 104 To 107 |
| 32 | प्रा. रूपाली कांबळे | नवदोत्तरी स्त्रीवादी कादंबरी | 108 To 110 |
| 33 | Dr. Krishna B. Patil | Rational Emotive Thinking And Academicachievement Of UG Students: A Correlational Study | 111 To 113 |
| 34 | Dr.Vandana Singh | Need Of Physical Education Programme In Present Scenario | 114 To 115 |
| 35 | Dr.Snehal Ram Rathod | Breast Milk –Production and Benefits | 116 To 119 |
| 36 | Dr.Snehal Ram Rathod | Changes in Cardiovascular System During Pregnancy | 120 To 121 |
| 37 | Dr.Vikram Kunturwar | Benefits of Regular Meditation Practice | 122 To 124 |
| 38 | Dr.Vikram Kunturwar | Relation of Regular Yoga Practice And Cardiovascular Fitness | 125 To 127 |
| 39 | Dr. Ranjan K. Badwanay | Health Related Benefits of Hatha Yoga | 128 To 130 |
| 40 | Chandrakant A. Naik | Immunity Booster: Positive Health Habits | 131 To 133 |
| 41 | Dr. Shobha V. Kalebag | Multiculturalism - Essential Cross-Cultural Skills for the Workplace | 134 To 135 |
| 42 | Dr. Rajiv N. Aherkar | Ernest Hemingway's, 'The Old Man and the Sea': A Fountain of Inspiration | 136 To 139 |

# Ernest Hemingway's, 'The Old Man and the Sea': A Fountain of Inspiration

**Dr. Rajiv N Aherkar,**
Assistant Professor, Dept. of English,
YVSPM's Late Sow S.S.M. Arts College,
Gangakhed Dist. Parbhani-431514.

**Abstract:**

*The paper is an attempt to present how Ernest Hemingway tried to inspire the readers through his literary work. 'The Old Man and the Sea'. Ernest Hemingway is one of the most popular American writers of the 20th century. The novella, 'The Old Man and the Sea' invites the readers to read at various levels. The reader can receive the novella as a realistic story of an old man, Santiago who is an inspiration to the readers. The character, Santiago never gives-up and has self-confidence. He continues his journey even after failure. He has a strong belief that one day he will prove his ability. Santiago fights against the forces of the nature and catches a giant fish, Marlin and fights with the sharks to save the Marlin. Santiago's struggle proves that 'a man can be destroyed but not defeated'. The focus is also given to present how Santiago uses his experience to overcome all the calamities and make a way which leads towards success. The story of an aging fisherman, Santiago proves that Ernest Hemingway's writing is fascinated with idea of men proving their ability by facing and overcoming the challenges of nature. The paper is divided in to three parts. The first part is about the author, the second part is about the theme of inspiration and the third part is conclusion.*

***Key words:*** *Inspiration, Nature, Experience.*

## Introduction:

It is very necessary to know the biography of the writers like Hemingway because without knowing personal life and experiences of Hemingway, we cannot understand his work. Personal experiences of Hemingway have place in his writing. The personal experiences and the influences on him are responsible to shape his writing style. That is the reason, it is attempted to give a brief account of his life and work. Biographical account is taken from the '*Encyclopedia Americana*', Carlos Baker's '*Hemingway: the Writer as an Artist,*' and *Nobel Lecturers, Literature 1901-1967*, edited Horst Frenz.

Ernest Miller Hemingway, an American novelist and short storywriter, who is widely recognized as one of the great authors of the 20th century, was born on 21st July 1899 in Cicero Illinois, a suburb of Chicago. His father, Clarence Edmonds (Doctor Ed), a doctor of medicine, was a hunter, and fishing. Hemingway adopted his father's outdoorsman hobbies of hunting, fishing and camping in the woods and lakes of northern Michigan. This also shaped his interest and supplied the basis for his writing. His mother, Grace Hall Hemingway was interested in music. He inherited and observant eye and an extraordinarily sensitive mind.

Ernest Hemingway, a multifaceted personality, lived a legendry life and produced profound literature. His life and works were inter-dependent. He turned his life experiences into a literature. It proved to be of great interest to readers. His writing made him literary giant of twentieth Century American and won the Pulitzer Prize for Fiction in 1953 and the prestigious the Nobel Prize for Literature in 1954. In his writing, one experiences the simple but true picture of the nature. His observation at every phenomenon of nature gave power to his writing style, which made audience rather than mere reader/listener. The best example of it is the opening paragraph of the novel, The Old Man, and the Sea. Where one can experience the cinematize effect. Hemingway, like a camera, described the scene in which the reader experiences like an audience every detail about the character.

**Santiago: A Fountain of Inspiration:**

Ernest Hemingway introduced archetypal character, Santiago, an old angler of Havana, went to sea for eighty-four days for fishing. He could not hook any fish. Manolin, a boy, accompanied him for the first forty days. The boy left the old man the behest of his parents who thought that the old man was an unlucky because he met no success during

long period. Santiago's struggle proves that 'a man can be destroyed but not defeated'. Santiago lived according to his own code of behavior, accepting the natural order and cycle of life, struggling and enduring and redeeming his individual existence through his life's work, and then passing on to the next generation everything he values, Santiago becomes an everyman. Manolin has very fond of Santiago. He helped him to carry the fishing gear to his check. The patched sail was furled around the mast, and looked like the flag of permanent defeat. The blotches and cars on Santiago's body were the marks of his profession. His sea color eyes were cheerful and undefeated. He usually dreamed of golden and white beaches, great brown mountains and a number of lions he had seen in his visit to Africa in his youth-age. He no longer dreamed of storms, women, great occurrence, great fish, fights, and contest of straight nor of his wife. His dreams were also of positive which inspired him to over-come from the calamities he faced in his life. The story of Santiago is the story of everyman. The readers of different levels of understanding and ages can find something inspirational in this novella through the character of Santiago. Hemingway received the Nobel Prize for literature in 1954 for his powerful, style forming mastery of the art of modern narration, as most recently evidenced in '*the Old Man and the Sea*'. *(Quoted by Jobes Katharine: 1968:01)* In other words, the use of narrative technique in the novel '*The Old Man and the Sea*' is the main reason behind bestowing the *Nobel Prize for literature*. The very paragraph of the novel cinematically introduces us to the characters.

"*He was an old man who finished alone in a skiff in the Gulf Stream and he had gone eighty-four days new without taking a fish. In the first forty days, a boy had been with him. However, after forty days without a fish the boy's parents had told him that the old man was now definitely and finally salao, which is the worst form of unlucky that's why the boy had gone at their orders in another boat, which caught three good fish the first week. It made the boy sad to see the old man come in each day with his skiff empty and he always went down to help him carry either the coiled lines or the gat and harpoon and the sail that was furled around the mast. The sail was patched with flour sacks and, furled; it looked like the flag of permanent defeat (01).*"

*The novel is not divided into divisions or chapters but for our understanding. It can be divided into four sections as,*

The prologue, which introduces the reader to old Cuban fisherman Santiago,

Santiago's struggle with marlin and victory,

Santiago's struggle with sharks and defeat, and

The epilogue describes defeated Santiago becomes undefeated in spirit and discussing future plan with the boy, Manolin.

The structure of the novel is so beautifully constructed; each sentence has value in the narrative. If a single sentence is removed, it will damage the meaning.

